१९९४
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0014275
REFBK-0014275

मुंबईचा मार्गदर्शक

# ही पहा मुंबई



# ही
# पहा
# मुंबई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38631 दि:
क्रमांक 363 नों. दि. २५.५.५५

लेखक

## सदानंद चेंदवणकर

REFBK-0014275
REFBK-0014275
संग्रहालय ठाणे
दा. क्र. 14269
शाखा (स्थळ प्रत)

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २

* : २०१ : मूल्य १ रुपया *

• **मुद्रक**

जयराम दिपाजी देसाई
राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई ४

★

• **प्रकाशक**

गजानन काशीनाथ रायकर
झावबाची वाडी, मुंबई २

★

• **प्रथमावृत्ति**

१५ ऑगस्ट १९६४

★

• **मुखपृष्ठ**

रघुवीर मुळगांवकर
२१५ चर्नीरोड, गिरगांव, मुंबई ४

★

• **विक्रेते**

जय हिंद प्रकाशन, झावबाची वाडी
मुंबई नंबर २

• मुंबई शहर स्वतंत्र महाराष्ट्राची राजधानी आहे. या शहराचें आकर्षण भारताच्या सर्व राज्यांना तर आहेच, पण विशेषत्वानें भारताच्या राजधानीला अधिक आहे. विविध उद्योग, व्यवसाय, धंदे, व्यापार या अवाढव्य शहरांत चालतात, त्यामुळें आंतरराष्ट्रीय व्यापाराचें तें एक केंद्र समजलें जातें. अठरापगड जाती-जमातींनीं एकच गर्दी करून सोडलेलें असें हें शहर सुंदर तर आहेच, पण तें आणखी सुंदर बनविण्याचे यत्न येथल्या महापालिकेतर्फे नित्य चालू असतात. अनेक थोरामोठ्यांनीं, नामवंतांनीं या नगरीची शोभा वर्णन केली आहे, तर ज्येष्ठ–श्रेष्ठ साहित्यिकांनीं या नगरीचें वैभव टिपून ठेवलें आहे. या शहराची शोभा पहाण्यासाठीं राज्याराज्यांतील लोक येतातच, पण देशादेशांतूनही येतात आणि या रम्य नगरीचें डोळे भरून दर्शन घेतात. भारताला भेट देणाऱ्या पाश्चात्य पाहुण्यांना तर मुंबईभेटी-शिवाय भारत दौरा पूर्णच झाला नाहीं असें वाटतें.



श्री. शै. ए. सुखठणकर

या नगरींतील लोक सूर्यवंशी नाहींत. भल्या पहांटे या नगरींतील लोकांच दैनंदिन जीवन सुरू होतें आणि मध्यरात्रीं बऱ्याच उशीरां तें थांबतें. याला कारण आहे येथल्या श्रमजीवींचे विविध उद्योगधंदे,

कामगारांच्या गिरण्या, शौकिनांचीं चित्रपटगृहें, रसिकांचीं नाट्यगृहें, विलासींचीं उपाहारगृहें, क्लब्स्, ज्ञानपिपासूंचीं वाचनालयें, विद्यार्थ्यांचीं विद्यालयें, महाविद्यालयें. मुंबईतील ऐसपैस रस्त्यांवरून धांवणाऱ्या लाल-लाल बसेस्, टांगे, आगगाड्या, टॅक्सी, उतारूंची सारखी वहातूक करीत असतात. नवख्या प्रवाशाला तर या अशा अवाढव्य, गजबजून गेलेल्या नगरींत अक्षरशः भांबावल्यासारखें होतें, गोंधळून गेल्यासारखें होतें यांत नवल नाहीं. पण ही अडचण दूर करण्यास हा "मुंबईचा मार्गदर्शक" खचितच उपयोगी ठरेल असा मला विश्वास वाटतो. मुंबईला नव्यानें भेट देणाऱ्या प्रवाशालाच नव्हे, तर खुद्द मुंबईकरांना सुद्धां या ग्रंथाद्वारें खूपशी माहिती मिळत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

माझे पत्रकार मित्र आणि एक कष्टाळू लेखक श्री. सदानंद चेंदवणकर यांनीं हा ग्रंथ बऱ्याच मेहनतीनें सादर केला आहे, याबद्दल त्यांचें हार्दिक अभिनंदन करावेंसें वाटतें. सप्तद्वीपापासून तों आतांपर्यंतची मुंबई शहराची सर्व ती माहिती, मुंबईतील नव्या-जुन्या स्थळांचा इतिहास, मुंबईतील जुन्या रस्त्यांचीं नवीं नांवें, मुंबईतील गिरण्या, चित्रपटगृहें, रुग्णालयें, सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्था, क्लब्स्, उपाहारगृहें, वाचनालयें, विद्यालयें, महाविद्यालयें, बँका, बसचे नवे क्रमांक व त्यानुसार मार्ग, मंदिरें, दर्गे, ख्रिस्ती प्रार्थना मंदिरें, लेखक, नट, नटी, नाटककार, वृत्तपत्रें, रोगांचे तज्ज्ञ डॉक्टर्स इत्यादिकांचे पत्ते व तदनुषंगिक सर्व ती बारीकसारीक माहिती या छोट्या ग्रंथांत दिलेली आहे ती वाचकांना हरघडी उपयोगी पडेल अशी खात्री आहे. ह्या स्तुत्य उपक्रमास महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धीखात्याकडूनही जरूर तें प्रोत्साहन मिळेल, असा आत्मविश्वास वाटतो.

श्री. चेंदवणकर यांच्या या प्रयत्नास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**शै. ए. सुखठणकर**
कमिशनर, मुं. म्यु. कॉर्पोरेशन

दिनांक १५ ऑगस्ट १९६४

★

# लेखकाचे दोन शब्द

मुंबई हें शहर महाराष्ट्राच्या राजधानीचें शहर म्हणून ओळखलें जातें. भारतांतील प्रमुख शहर म्हणून तर त्याचा लौकिक आहेच. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील व्यापार उद्योगाचें बंदर म्हणून त्याची जगभर ख्याति आहे. यामुळें या रम्य शहराचें आकर्षण दुनियेंतल्या सर्वच नागरिकांना असणें अगदीं सहाजिक आहे. या अवाढव्य शहरांत नवखा प्रवासी आला रे आला कीं तो अक्षरशः भांबावून जातो. काय पहावें आणि काय पाहूं नये हें त्याला सुचतच नाहीं, भानच रहात नाहीं.

या सुंदर शहराचें दर्शन घ्यायचेंच झालें तर त्यानें नगरींतलें काय काय पहावें, येथले बसचे नि रेल्वेचे मार्ग त्याला कसकशी मदत करतील, येथलीं रुग्णालयें, प्रमुख कचेऱ्या, चित्रपटगृहें इत्यादिकांची उपयुक्तता या विषयांत नवख्याच काय, पण येथल्या रहिवाशांनाही हें पुस्तक उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.

या पुस्तकाला आमचे स्नेही आणि म्युनिसिपल कमिशनर श्री. शैलेंद्र सुखटणकर यांनीं छोटेखानी प्रस्तावना लिहून आणखी शोभा आणली आहे, त्याबद्दल त्यांचे आभार. सुप्रसिद्ध कल्पक प्रकाशक श्री. ग. का. रायकर यांनीं हें पुस्तक प्रकाशित केलें आणि श्री. जयरामभाऊ देसाई यांनीं आपल्या राष्ट्रवैभव छापखान्यांत तें अल्पावधींत आणि शक्य तितकें निर्दोष छापून वाचकांच्या हातीं ठेवलें त्याबद्दल त्यांचेही आभार. नगरपालिकेच्या कचेरींतील प्रसिद्धी विभागाचे अधिकारी श्री. मिस्त्री यांनीं आम्हांस अत्यंत तत्परतेनें आवश्यक तीं छायाचित्रें पुरविलीं त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद.

अंबिका निवास, आग्रा रोड<br>
कुर्ला, मुंबई ७०<br>
ता. १५ ऑगस्ट १९६४

सदानंद चेंदवणकर

★

तुम्ही आणि राष्ट्राच्या जीवनवाहिन्या—१



**मी असें करीन ना?** शत्रूचा परत हल्ला झाला तर मी दृढतेनें माझें कर्तव्य बजावीन ना! हाच एक विचार प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मनांत उभा राहतो. हाच आज सर्वांत मोठा प्रश्न आहे. पश्चिम रेल्वेवर, फायरमन असो कीं सेक्शन कंट्रोलर, गँगमन असो कीं गार्ड, प्रत्येकाला आपल्या कर्तव्याची जाणीव आहे. त्यांच्यांपकीं प्रत्येकास माहीत आहे कीं राष्ट्राच्या जीवनवाहिन्या सदैव चैतन्यमय ठेवण्यासाठीं आपण करीत असलेले प्रयत्न म्हणजेच मातृभूमीच्या संरक्षणासाठीं महान सेवा होय. ही त्याची कर्तव्य तत्परताच सीमेवरील जवानांना सुसज्ज राखते आणि तो आपली कामगिरी आनंदानें व साभिमान पार पाडतो.

पश्चिम रेल्वे



# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | मुंबापुरीचा इतिहास | ९ |
| २ | सुस्वागतम् | १ |
| ३ | पहिला दिवस | २ |
| ४ | दुसरा दिवस | १५ |
| ५ | तिसरा दिवस | २६ |
| ६ | चौथा दिवस | ३२ |
| ७ | बृहन्-मुंबईतील बस वहातुक | ३८ |
| ८ | वॉर्ड व नगरपिते | ६१ |
| ९ | टपाल कचेऱ्यांचे क्रमांक | ६३ |
| १० | रेल्वेचीं स्थानकें | ६४ |
| ११ | प्रसिद्ध लॉजिंग बोर्डिंग | ६५ |
| १२ | प्रसिद्ध रुग्णालयें | ६६ |
| १३ | पोहण्याचे तलाव | ७१ |
| १४ | विमान कंपन्या | ७२ |
| १५ | कापड गिरण्या | ७४ |
| १६ | प्रमुख बँका | ७७ |
| १७ | चित्रपटगृहें | ८१ |
| १८ | महाविद्यालयें | ८४ |
| १९ | मंगलकार्यांसाठीं सभागृहें | ८७ |
| २० | लोकोपयोगी संस्था | ९० |
| २१ | ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें | ९४ |
| २२ | शाकाहारी उपाहारगृहें | ९६ |
| २३ | जुने रस्ते-नवीं नांवें | ९७ |
| २४ | लेखक व त्यांचे पत्ते | १०० |
| २५ | नाटककार-नटनटी | १०३ |
| २६ | सांस्कृतिक संस्था | १०७ |
| २७ | प्रकाशन संस्था | १११ |
| २८ | तज्ज्ञ डॉक्टर्स | ११३ |
| २९ | नाट्यगृहें | ११६ |
| ३० | नियतकालिकें | ११९ |
| ३१ | मुंबापुरीच्या परिसरांत | १२१ |



★ मुंबईची धनदेवता : श्रीमहालक्ष्मी ★

मराठी ... स्थळ ...
अनुक्रम ३८६३७ दि: ...
क्रमांक ३८६३ नों: दि: ...

# मुंबापुरीचा इतिहास

आपल्या भारतांतील पहिलें प्रमुख शहर जर कोणतें असेल, तर तें म्हणजे मुंबई हें होय. या नगरींत भारतांतील प्रत्येक प्रांतांतील आणि प्रत्येक जिल्ह्यांतील माणसें तर आहेतच, परंतु पृथ्वीच्या पाठीवर असा एकही देश आढळणार नाहीं कीं, ज्याचा एकादा तरी नागरिक मुंबईत वास्तव्य करून राहिलेला नाहीं. " भारताचें प्रवेशद्वार " म्हणून या शहराचा मोठा गौरवपूर्ण उल्लेख करण्यांत येतो तो यामुळेंच कीं, भारताला भेट देणारे पाश्चिमात्य प्रवासी याच नगरींत प्रथम उतरतात आणि नंतर या सुंदर देशांत हिंडतात फिरतात. भारताचें आजचें हें सर्वश्रेष्ठ नगर कैक वर्षांपासून आपल्या वैचित्र्यामुळें परकीयांचें आकर्षण झालें होतें अन् आजही त्याचें आकर्षण कायम आहे. हेंच या नगरीचें वैशिष्ट्य होय. आज मध्यरेल्वेवर कुलाब्यापासून मुलुंडपर्यंत आणि पश्चिम रेल्वेवर चर्चगेटपासून मालाडपर्यंत पसरलेला २५००० चौरस एकरांचा प्रचंड टापू या मुंबानगरीनें व्यापलेला आहे.

सध्यां आपल्या लक्षांत येत नाहीं, परंतु मुंबई हें शहर सात बेटांवर वसलेलें आहे. महिकावती ऊर्फ माहीम, कोलभाट किंवा कुलाबा, मच्छगांव किंवा मध्यगांव म्हणजेच माजगांव, वरळी, मोंबायिम, अल–ओमानिस, व परेल अशीं हीं सात बेटें होत. या सप्तद्वीपांना " हेप्टानेशिया " या नांवानें ग्रीकलोक ओळखीत असत. ख्यातनाम ग्रीक तत्त्वज्ञ टॉलेमी यानेंही तसा उल्लेख करून ठेवला आहे. उत्तर कोंकणांत त्यांचा समावेश होत असे. हीं सात बेटें केव्हां आणि कशीं अस्तित्वांत आलीं हें विद्वानांना सांगतां येत नाहीं. बहुधा भूकंपामुळें हीं बेटें ' अपरांता ' ( उत्तर कोंकणचें पौराणिक नांव ) पासून वेगळीं झालीं असावींत. पण आज मानवी प्रयत्नानें तीं सारीं एक झालीं आहेत हें खरें.

या सात बेटांचा म्हणजे मुंबईचा अतिप्राचीन इतिहास सुस्पष्ट असा नाहीं. तरी पण हीं बेटें फार प्राचीन काळापासून युरोपांतील आणि इतर देशांतील दर्यावर्दी लोकांना ठाऊक होतीं आणि विशेष म्हणजे तीं निर्जन, ओसाड म्हणून माहीत होतीं. आज विसाव्या शतकांत हें शहर व्यापार,

उद्योग, कारखाने यांनीं भरभराटीस आलेलें आणि ४० लाख लोकवस्तीनें गजबजलेलें आहे.

अगदीं प्राचीन काळीं या अशा मुंबई बेटाला वेगळें राजकीय अस्तित्व नव्हतें. कोंकणचाच तें एक भाग होतें. संस्कृत लेखक त्याला "अपरान्त" (Aparanta) म्हणत असत. या विभागाचा अगदीं प्राचीन राज्यकर्ता इतिहासतज्ज्ञांच्या मतें सम्राट् अशोक हा होता. गिरनार येथें कोरलेल्या कांहीं शिलालेखांवरून असें दिसतें कीं, सम्राट् अशोकानें खिस्तपूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्यास बौद्ध धर्माच्या प्रसार-प्रचारासाठीं राष्ट्रीक, पेठनिक आणि अपरान्त या देशांकडे धर्मगुरु पाठविले होते.

सम्राट् अशोकानंतर शातवाहन हे या मुंबई विभागाचे राजे झाले. खारवेल आणि नाणाघाट येथील गुहेंत कोरलेल्या शिलालेखांवरून या गोष्टीची साक्ष पटते. तेव्हां इसवी सनाच्या पहिल्या शतकांत अपरांतावर शातवाहनांचा अंमल होता. त्यांचें राज्य तीनशें वर्षें चाललें. या काळांत मुंबईचा इतर देशांशीं व्यवहार होऊं लागला. पुढें व्यापार भरभराटला. कल्याण या शहराची याच काळांत स्थापना झाली आणि ग्रीक, अरब, पर्शियन, इजिप्शियन आणि खिश्चन या व्यापाऱ्यांचें तें एक महत्त्वाचें बंदर झालें. अर्थातच या विभागांत कोणी स्थायिक असें नव्हतें. व्यापाराचेंच तें केंद्र होतें. पुढें याच काळांत कोळी या बेटावर प्रथम आले. कोळी आजूबाजूच्याच मराठी प्रदेशांतून येथें आले. मुंबई तेव्हां पण सात बेटांची मिळून होती. या सातही बेटांत कोळी पसरले आणि राहूं लागले. त्यांनीं मुख्य वस्ती मात्र दक्षिणेच्या दोन बेटांवर केली.

या प्राचीन काळांत या प्रदेशावर विशिष्ट अशा सत्ताधाऱ्यांचें राज्य फार काळ टिकलें नाहीं. वेगवेगळ्या बदलत्या राजांबरोबर मुंबई बेटावरील सत्ता पण बदलत गेली.

शातवाहनांनंतर चालुक्यांची सत्ता या बेटावर सुरू झाली. ते इ. स. ७५७ पर्यंत पश्चिम किनाऱ्याचे अधिपति होते आणि मुंबईचीं बेटेंही त्यांच्या सार्वभौम प्रदेशांत मोडत होतीं. परंतु चालुक्यांची सत्ता संपुष्टांत येऊन राष्ट्रकूट पश्चिम किनाऱ्याचे सत्ताधारी झाले आणि चालुक्य सत्तेचा कांहींच

अवशेष या प्रदेशावर राहिला नाहीं. तथापि त्यांचा येथें प्रभाव राहिला. कोळ्यांतील 'चोळके' हें नांव चालुक्य या नांवावरूनच आलेलें आहे.

परंतु पुढें राष्ट्रकूटांचा राजा तिसरा गोविंद यानें उत्तर कोंकणची राज्य-व्यवस्था शिलाहार राज्याचा संस्थापक कपरदिन शिलाहार यास बहाल केली. या शिलाहारांनीं इ. स. ८१० ते १२६० पर्यंत येथें राज्य केलें. पुढें दहाव्या शतकांत शिलाहार स्वतंत्र झाले. या त्यांच्या राज्यांत मुंबईसकट ठाणें जिल्हा आणि कुलाबा जिल्हा यांचा अंतर्भाव होता.

सुमारें बाराव्या शतकाच्या आरंभीं गुजरातचा राजा कुमारपाल यानें शिलाहारांचा पराभव करून त्यांचें राज्य जिंकून घेतलें आणि मुंबईसकट कोंकणचा भाग गुजराती सत्ताधीशांच्या अंमलाखालीं आला. परंतु कुमारपालाचा हा विजय अल्पजीवी ठरला. कुमारपाल हा फार काळ येथें राज्यच करूं शकला नाहीं. कारण शिलाहारांनीं आपल्या सामर्थ्यानिशीं पुन्हां कुमारपालावर हल्ला केला आणि त्याला हांकून लावलें. अशा प्रकारें मुंबईवरचें कुमारपालाचें वर्चस्वही संपुष्टांत आलें.

शिलाहारांच्या कारकीर्दींत येथें वसाहत आणि व्यापार खूप भरभराटीस आला आणि मुंबई शहराला सर्वधर्मीय स्वरूपही या मराठा राज्याच्या कारकीर्दींतच आलें. हिंदु, मुसलमान, पारशी, पर्शियन, अरब, चिनी, मुंबई बंदरांत व्यापारानिमित्त व इतर कारणांमुळें येऊं लागले आणि त्यांपैकीं कांहीं स्थायिक पण झाले. या शिलाहारांनीं आपल्या अमदानींत येथें बरींचशीं देवळें बांधलीं. त्यांपैकीं अंबरनाथ आणि वाळकेश्वर ( वालुकेश्वर ) हीं दोन प्रमुख होत. भांडुपच्या उत्तरेकडून आजच्या मुंबई-ठाणें रस्त्याला समांतर असा एक राजरस्ता त्यांनीं बांधला. शिलाहारांनीं कोरलेल्या शिलालेखांवरून पाठारे प्रभू आणि यजुर्वेदी ब्राह्मण आणि आणखी कांहीं जाती मुंबईत येऊन स्थायिक झाल्याचें सिद्ध होतें.

पुढें सोम नांवाच्या शिलाहाराचा देवगिरीच्या महादेव यादवानें पराभव केला आणि शिलाहारांचें राज्य लयाला गेलें. इ. स. १२६० पासून १३४५ पर्यंत देवगिरीच्या यादवांचा मुंबईवर अधिकार होता. अच्युत नायक नांवाचा यादवांचा एक कारभारी येथला कारभार पहात असे, असें डॉ. फ्लिट यांनीं

लिहून ठेवलें आहे. इ. स. १२९० मध्यें कृष्ण नांवाचा भारद्वाज गोत्राचा ब्राह्मण सर्वंध कोंकणचा कारभार पहात होता.

अल्लाउद्दिन खिलजीनें देवगिरीच्या यादवांच्या केलेल्या निःपातानंतर मुंबईच्या इतिहासांत महत्त्वाचे फेरबदल झाले. रामदेवरावाच्या पराभवानंतर त्याची कोंकण-मुंबईवरील सारी सत्ता संपुष्टांत आली, आणि बिंब किंवा भीम राजानें मुंबईवर आपलें स्वामित्व प्रस्थापित केलें. बिंबाख्यानामध्यें बिंब हा अनहिलवाड्याच्या बाजूनें कोंकणांतून इ. स. १२९४ मध्यें मुंबईस आला असें वर्णन आहे. माहीमचें बेट त्याला निर्जन अवस्थेंत सांपडलें. त्यानें तिथें वस्ती करण्याचें ठरविलें. तेथें स्वतःसाठीं एक राजवाडा बांधला, आणि सोबत आणलेल्या लवाजम्यासाठीं घरें बांधलीं. येतांना पैठणहून त्यानें आपल्याबरोबर यजुर्वेदी ब्राह्मणांचीं नऊ कुटुंबें आणि इतर ६६ कुटुंबें आणलीं. त्यांतलीं २७ कुटुंबें सूर्यवंशी, ७ शेषवंशी, ५ पांचाळ, ५ कुणबी आणि आग्री इत्यादि होतीं असा उल्लेख एस्. एच्. एडवर्ड यांनीं लिहिलेल्या ' राइझ ऑफ बॉम्बे ' या पुस्तकांत केलेला आढळतो. यावरून बिंबदेवानें आपल्या महिकावती राजधानींत प्रभू लोकांची एक वसाहतच स्थापन केली.

इ. स. १३४८ मध्यें गुजरातमधील मुसलमान सुलतानांनीं मुंबईवर स्वारी करून तिचा कांहीं भाग पादाक्रांत केला. ही इसलामी राजवट तब्बल दोन शतकें म्हणजे इ. स. १५३४ पर्यंत टिकली. या काळाचा एक अवशेष आजतागायत माहीम येथें आढळतो. तो म्हणजे माहीमला असलेल्या तेव्हांच्या एका मुसलमान अवलियाचा दर्गा. या ठिकाणीं अद्याप दरवर्षी डिसेंबरमध्यें मोठा उत्सव उरूस भरतो. या दर्ग्याला मखतुम फकिह अलि पारूचा दर्गा असें म्हणतात.

इ. स. १५३४ मध्यें पोर्तुगीजांनीं वसई काबीज केली. त्या काळीं वसईचें मोठें महत्त्व होतें. गुजरातचा तेव्हांचा सुलतान बहादुरशहा याला वसई व त्या आसपासचा भाग पोर्तुगीज आक्रमकांना देणें भाग पडलें. पुढें पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांनीं लौकरच आपले हातपाय पसरून मुंबई बेटावर आपली सत्ता स्थापली. परंतु पोर्तुगीजांनीं येथें सक्तीनें बाटवाबाटवी केल्यामुळें हीं बेटें आणखी ओसाड झालीं. तेव्हां पोर्तुगीजांनीं या बेटाचे विभाग पाडून ते दीर्घ मुदतीच्या भाडेकरारानें कांहीं वजनदार व्यक्तींच्या स्वाधीन केले. डॉ.

गेर्सो द कुन्हा ( Gerson de Cunha ) हा त्या व्यक्तींपैकीं एक होता. या गेर्सोनें भारतीय औषधांवर त्या काळीं लिहिलेला विद्वत्तापूर्ण ग्रंथ अद्यापि नांवाजला जातो. आज टाऊन हॉलच्या मार्गे ज्या "नेव्हल बॅरॅक्स" आहेत, त्याच जागीं एका टुमदार बंगलींत हे गेर्सो महाशय राहात. मुंबई व साष्टी या भागांत आज ख्रिस्ती लोकांचीं प्रार्थनामंदिरें जीं जागोजाग दिसतात, त्यांतील बहुतेक मंदिरें त्या काळीं उभारण्यांत आलीं होतीं. त्या जमान्यांत धार्मिक संस्थांना जमिनी मुक्त हस्तें दिल्या जात. त्यामुळें मुंबईचा उत्तर भाग व बहुसंख्य उपनगरें यांत या संस्थांनीं आपलें बळकट बस्तान बसविलें होतें. ग्रेटब्रिटनचा राजा दुसरा चार्लस व पोर्तुगालची राजकन्या कॅथेराइन-द ब्रागोझा यांचा विवाह इ. स. १६६१ सालीं झाला. त्या वेळीं मुंबईची बेटें व त्यांवरील सर्व हक्क इंग्लंडच्या नवरदेव राजाला आंदण देण्यांत आले.

परंतु मुंबईतील पोर्तुगीज अधिकारी आणि हितसंबंधी लोक यांनीं या आंदणपत्राला जोराचा विरोध केला, त्यामुळें हें बेट इंग्रजांच्या ताब्यांत येईतोंपर्यंत इ. स. १६६५-६६ साल उजाडावें लागलें. याचें कारण येथल्या फिरंग्यांना या बेटाचें भावी काळांतील महत्त्व वाटत होतें, हें होय.

अखेरीस १६६५ च्या सुमारास मुंबई बेटें ब्रिटिश राजाच्या हातीं आलीं आणि मुंबईच्या इतिहासाचें एक नवें पर्व सुरू झालें. त्या वेळीं त्याची लोकसंख्या अवघी दहा हजारांच्या आसपास होती. आणि त्यानंतर दहा वर्षांच्या काळांत अर्थात् १६७५ मध्यें ती साठ हजारांपर्यंत गेलेली होती. त्या वेळीं या बेटांवर कोळी, आगरी व पाठारे प्रभू यांचीच काय ती वस्ती होती. बेटापासून मिळणारें आर्थिक उत्पन्न तेव्हां अगदींच तुटपुंजें होतें. आझाद मैदान ते मलबार हिल आणि प्रभादेवी ते माहिम या भागांतील नारळांच्या झाडांपासून तें उत्पन्न मिळत असे. थोडीं भाताचीं शेतेंही होतीं, पण बाकी सारा प्रदेश दलदलीचा व निर्जन असा होता.

इ. स. १८६५ मध्यें मुंबई नगरपालिकेची स्थापना झाली व त्यामुळें शहरांत साफसफाई, स्वच्छता राखण्यास मदत होऊं लागली. याच वर्षी शहरांत गॅसचे दिवे सुरू झाले आणि काळोखी रस्ते प्रकाशानें उजळून निघाले. शुक्रवार ता. २५ मे १८६५ रोजीं चिंचपोकळीचा रस्ता गॅसच्या

बत्त्यांनीं सुप्रकाशित करून एक आगळीच शोभा त्याला आणण्यांत आली. या पेटलेल्या बत्त्या बघून कितीतरी लोक खांबाजवळ जाऊन आपला हात भाजतो कीं काय म्हणून हळूच सावधगिरीनें खांबाला हात लावून पहात असत. आणि हात भाजत नाही असें कळून चुकल्यावर खांबावर चढून बत्ती पेटते कशी तें पहाण्यासाठीं धडपडत असत.

१८७५ च्या सुमारास सर कावसजी जहांगिर बॅरोनेट यांनीं १ लाख रु. व श्रीमंत प्रेमचंद रामचंद यांनीं २ लाख रु. मुंबई विद्यापीठास देणगी म्हणून दिले व त्यांतून विद्यापीठाची इमारत व त्यावर खुलून दिसणारा राजाबाई मनोरा बांधण्यांत आला.

ता. १ जानेवारी १८८२ पासून बोरीबंदर हें जी. आय. पी. रेल्वेचें स्टेशन वाहतुकीसाठीं खुलें करण्यांत आलें. बोरी बंदर हें नांव या स्थळास पडण्याचें कारणही तसेंच ऐतिहासिक आहे. या स्थानकानजीकच बोहरा बाजार आहे. येथें पूर्वीं बोहरी जमातीच्या व्यापाऱ्यांचीं जहाजें लागत असत. त्यांच्या व्यापारी पेठा बोहरी बाजारांत असत. यामुळें या भागास "बोरी बंदर" असें नांव पडलें व तेंच आजतागायत चालू आहे.

इ. स. १८९३ सालीं मुंबई महापालिकेची स्वतःची इमारत बोरी बंदर स्टेशनसमोर बांधण्यांत आली. ऑर्थर रोडवरचें सांसर्गिक रोगांचें इस्पितळही १८९३ च्या सुमारास बांधण्यांत आलें. पूर्वी मुंबई महापालिकेची हद्द पूर्वेकडे शींवपर्यंत व पश्चिमेकडे माहीमपर्यंत होती. पण १९५० सालीं बृहन्मुंबईची योजना अंमलांत आली व महापालिकेची हद्द पश्चिम रेल्वेवर मालाड स्टेशन पर्यंत व मध्य रेल्वेवर मुलुंडपर्यंत गेलेली आहे.

आज या अवाढव्य मुंबई शहरांतील वाहतूक हें एक प्रचंड प्रकरण आहे. रोज ८ ते १० लाख लोकांची, म्हणजे दर ताशीं सुमारें ४० हजार लोकांची वाहतूक स्थानिक आगगाड्या करीत आहेत. ह्यावरून या अवाढव्य प्रश्नाची कल्पना करतां येईल. बोरी बंदरपासून कर्जतपर्यंत ४६ मैल अंतर, बोरी बंदर ते कुर्ल्यापर्यंत ९॥ मैल अंतर, कुर्ला ते मानखुर्द हें ४ मैल अंतर, चर्चगेट ते विरार हें सुमारें ४५ मैलांचें अंतर, एवढ्या भागांत विजेच्या आगगाड्या आहेत व चोवीस तासांत मध्य रेल्वे सुमारें ६१२ गाड्या व पश्चिम रेल्वे सुमारें ३१० गाड्या सोडते. काय ही उतारूंची प्रचंड वर्दळ ! !

१८७० सालीं म्हणजे रेल्वे सुरू झाल्यापासून १७ वर्षांनंतर दादरहून गाडींत चढणारे एकूण सबंध दिवसाचे प्रवासी फक्त ३० ते ३७ असत. या स्थानिक आगगाड्यांच्या जोडीला ट्रॅम्स व लाल बसेसही लोकांच्या वाहतुकीला बराचसा हातभार लावीत आहेत. १८७० मध्यें रेकले हेंच काय तें या शहरांत वाहतुकीचें साधन होतें. ह्या रेकल्यांचें मुंबादेवीपासून बझार गेट स्ट्रीट पर्यंतचें भाडें अवघें पाऊण आणा असायचें. पैसेवाल्यांकरितां दोन घोड्यांच्या बग्गया होत्या व त्यांत पांच उतारू बसूं शकत. १८७४ च्या सुमारास घोड्यांच्या ट्रामगाड्या एका इंग्रज कंपनीमार्फत येथें चालविण्यांत येत होत्या. याच सुमारास बेस्ट कंपनीची स्थापना झाली व १९०७ सालीं या कंपनीनें विद्युत्शक्तीवर चालणाऱ्या ट्राम्स सुरू केल्या. १९२० सालीं दुमजली ट्रामगाड्या या शहरांतून धांवूं लागल्या व उतारूंची मोठ्या संख्येनें वहातूक करूं लागल्या. १८८२ मध्यें बेंत्र नांवाच्या एका कल्रक इंग्रजानें व्हिक्टोरिया हें चार चाकी वाहन या नगरींत सुरू केलें. १९२६ सालीं बेस्ट कंपनीनें बसेस सुरू केल्या. सबंध मुंबई शहराला सुरवातीला अवघ्या २४ बसेस् होत्या, पण सध्यां ६५० वर बसेस रस्त्यावरून हिंडत फिरत असतात. दरवर्षी या बसेस्मधून ३५ कोटी लोक प्रवास करतात असा अंदाज आहे. मुंबईत पहिली मोटारगाडी १९११ त आली. ती मोटार फोर्ड मॉडेल होतें. १९१८ त मुंबईच्या रस्त्यावर विजेचे दिवे लावण्यास सुरुवात झाली.

अशा या चाळीस लाख लोकवस्तीनें गजबजलेल्या, श्रीमंत नि गरीबांचें वसतिस्थान असलेल्या, जीवनकलहाच्या कोलाहलानें उबून गेलेल्या, नाना-तऱ्हेच्या विलासांत गर्क असलेल्या, नाना तऱ्हेचीं दुःखें असलेल्या, या नगरीला मुंबई हें नांव कसें काय पडलें हें पाहाणें मोठें मनोरंजक ठरेल.

इ. स. १५०८ पासून पोर्तुगीज खलाशी आणि इतर प्रवाशांच्या पत्रव्यवहारांतून अपभ्रष्ट स्वरूपांत मुंबईचा नामनिर्देश केल्याचें आढळतें. गॅस्पर कोरिआनें मुंबईचा उल्लेख 'बॉबैम' असा केला आहे, तर मिरात-ई-अमहदींत 'मनबाई' आणि 'मुंबै' असाही उल्लेख आढळतो. पोर्तुगीजांनीं कदाचित् हें बंदर वाहतुकीस चांगलें म्हणून त्याला त्याअर्थी दिलेल्या 'ब्वॉबाइया' ह्या नांवावरून सुद्धां बॉम्बेम् हें नांव पुढें प्रचारांत आलें असावें. इ. स. १५२५ मधील कांहीं पोर्तुगीज लेखकांच्या लिखाणांत 'मुंबै'

असा स्पष्ट निर्देश आहे. १६६७ सालीं पाडलेल्या सुरती रुपयांवर मात्र 'बॉम्बे' असा स्पष्ट उल्लेख आढळतो; व त्यावरूनच हें नांव रूढ झालें असावें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. १७ व्या शतकांतील आंग्ल लेखकांच्या मतें 'बाऊन बाहिया' (म्हणजे उत्तम उपसागर) या शब्दावरून "बॉम्बे" हें नाव पडलें. १८६९ मध्यें ओव्हिंग्टन हा संशोधक 'बून बे' वरून 'बॉम्बे' हा शब्द आला असें गृहीत धरतो. अरबी समुद्राशीं झुंज देऊन मुंबई बंदरांत पाऊल टाकणाऱ्या अरबी खलाशांना एकदम हायसें वाटलें आणि त्यांनीं या बंदराला 'मुबारक' असें म्हटलें आणि त्यावरून 'मुंबई' हा शब्द कालांतरानें रूढ झाला असाही कित्येकांचा तर्क आहे. सर जेम्स कॅंपबेल या प्रख्यात संशोधकानें या सर्वांचा तर्क बाजूला सारून मुंबई शहरांतील मुंबादेवीचें जें देऊळ आहे, त्यावरूनच मुंबई हें नांव पडलें असावें असा दावा केला आहे. मुंबईचे मूळचे रहिवासी कोळी होते. ह्या कोळ्यांचें कुलदैवत म्हणजे मुंबादेवी. ह्या देवीला अंबा असें संबोधतात. महा म्हणजे मोठी व महा अंबा म्हणजे मोठी अंबा किंवा मोठी देवी. देवीस आई असेंही म्हणण्याची पद्धत आहे, त्यावरूनच महाअंबेचें महाअंबाई असें रूप झालें व त्यावरूनच मुंबई हें नांव पडलें असावें.

ह्या बेटावर राहाणाऱ्या मुंगा नांवाच्या एका कोळ्यानें एक देवीचें देऊळ स्थापिलें होतें. तें पूर्वी एस्प्लेनेडवर होतें. ह्या देवीला मुंगाची अंबा असें म्हणत असत. मुंगाचें पुढें मुंबा होऊन मुंबाची देवी म्हणजे आई ह्या अर्थी देवी मुंबाई असें नांव ह्या देवीस पडलें. हें देऊळ १७३७ सालीं सध्यांच्या जागीं पायधुणीवर नेण्यांत आलें. हा मुंगा कोळी सधन जमीनदार असावा. कारण ह्याच्या मालकीची शेतवाडी मुंगभाट ह्या नांवानें परिचित होती व त्याच वस्तीचें पुढें मुगभाट हें नांव प्रचलित झालें व आजही तें कायम आहे.

कांहींही असो, आज मुंबई हा शब्द सर्वत्र रूढ झाला आहे. राज्यकारभारांतही तो वापरला जातो आणि या नांवाच्या शहराचें आकर्षण स्वदेशांतल्या आणि परदेशांतल्या लोकांनाही आहे. दलदलीनें भरलेलें हें एकेकाळचें छोटेंसें मच्छीमारी खेडें आज साऱ्या भारताचें अभिमानस्थान आणि जगांतील एक सुंदर शहर बनलें आहे.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... 36-39 ... दि: [illegible]
क्रमांक ... 3603 ... नों. दि. [illegible]

## सुस्वागतम् !

मित्र हो, या ! मुंबापुरींत तुमचें स्वागत असो. तुम्ही या नगरींत एकटेच आलां असाल किंवा तुमचे इष्टमित्र, आप्त-नातलग या नगरींत असतील त्यांचेकडे तुम्ही उतरलां असाल. केवळ मुंबई पहाण्यासाठीं वा जिवाची मुंबई करून घेण्यासाठीं तुम्ही आपल्या मित्राबरोबर अथवा आप्त-नातलगांबरोबर हिंडणार-फिरणार असाल. पण थोडे थांबा ! तुम्हांला त्यांची कितपत मदत होईल याची शंका वाटते. कारण या नगरींत असे अनेक लोक आहेत कीं, वर्षानुवर्षें ते येथें रहात असून सुद्धां त्यांना येथल्या कितीतरी स्थळांची अल्पशी सुद्धां माहिती नाहीं. मग त्यांची इतिहासजमा माहिती देणें दूरच. तेव्हां मित्र हो, तुम्ही येथें कुणावर विसंबून असे राहूं नका. या नगरींत तुम्ही मुळींमुळीं सुद्धां कुठें चुकणार नाहीं. आणि याचें मुख्य कारण आहे या अवाढव्य नगरींत पसरलेलें विविध वाहनांचें जाळें. रस्त्यांतून भल्या पहांटेपासून मध्यरात्रीपर्यंत धांवणाऱ्या लाल लाल बसेस्, पिवळ्या पगडीच्या टॅक्सीज, टांगे आणि आगगाड्या यांमधून तुम्ही बिनधोकपणें इच्छित स्थळीं जाऊं शकतां, हिंडूंफिरूं शकतां. कुठेंतरी चुकल्यासारखें वाटलेंच तर ठिकठिकाणच्या टपाल कचेऱ्या, बसगाड्यांचे कंडक्टर्स आणि चेकर्स तुम्हांला आवश्यक ती माहिती द्यायला सदैव तयार असतात; आणि ते जर नच आढळले, तर मग हा तुमच्या हातांतला मार्गदर्शक तुम्हांला हमखास मदत करील.

★

# पहिला दिवस—सकाळ

तर चला आपण **चर्चगेट** स्टेशनपासून सुरुवात करूं या. पश्चिम रेल्वेचें हें अंतिम स्थानक. येथून वांद्रें, अंधेरी, बोरीवली व विरार येथें जाण्याकरितां नियमितपणें लोकल गाड्या सुटतात. सुटीचे दिवस खेरीज करून सकाळीं ८–३० ते रात्रौ ८–३० पर्यंत येथें चांगलीच वर्दळ दिसून येते. या स्टेशनावरच पश्चिम रेल्वेच्या कांहीं कचेऱ्या आहेत आणि स्टेशनाच्या डाव्या हातास रस्त्याच्या पलीकडे मुख्य कार्यालय आहे. दगडी बांधणीची कार्यालयाची ही इमारत शिल्पकृतीचा एक सुंदर नमुना म्हणून ओळखली जाते. स्टेशनसमोर **एरॉस** हें इंग्रजी चित्रपट दाखविणारें आलीशान चित्रपटगृह आणि आग्नेय दिशेस दर्शनी भागावर मोठें घड्याळ असलेली **इण्डस्ट्रीयल ॲशुअरन्स कंपनीची** टोलेजंग इमारत आहे.

चर्चगेट स्टेशनच्या सात मजली इमारतीजवळूनच भुयारी रस्ता जात आहे. पायऱ्या उतरून जाऊन त्यामधून रस्ता आपण ओलांडूं शकतों. मुंबईत हा एवढा एकच भुयारी रस्ता आहे.

या भुयारी रस्त्यांतून वरती आल्यावर पूर्वेच्या रोखानें जाणाऱ्या रस्त्यास **वीर नरीमन रोड** असें नांव आहे. पूर्वीं त्याला चर्चगेट स्ट्रीट असें म्हणत असत. हा रस्ता तुम्हांला फ्लोरा फाऊंटनकडे घेऊन जाईल. वाटेंत **चर्चगेट क्रॉस मैदान** आणि **भिखा बेहरामची** विहीर लागेल. या विहिरीवर पारशांची दिवसभर जा–ये असते. बरीच जुनी ती आहे. या विहिरीजवळच रस्त्यावर रहदारीचें नियंत्रण करणारा विद्युत् खांब आहे. हा खांब नि रस्ता ओलांडून गेलें कीं लागलीच **मुख्य तार ऑफिस** (सी. टी. ओ.) ची दगडी इमारत दिसते. रात्रंदिवस ती उघडी असते व तेथून देशाच्या कोनाकोंपऱ्यांतच नव्हे, तर परदेशांतही तारा पाठविण्याकरितां त्या स्वीकारल्या जातात. या

इमारतीसमोरच पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटची दगडी दुमजली इमारत आहे. १८६९ सालीं पोस्टाकरितां म्हणून ती बांधण्यांत आली व ती मग पुढें पी. डब्ल्यू. डी. ला दिली गेली.

वीर नरीमन रस्ता ओलांडून दक्षिणेस जाणाऱ्या रस्त्यानें चालूं लागा. या रस्त्याचें नांव आहे मेयो रोड. उजव्या हातास एक मोकळें मैदान दिसतें. त्याचें नांव आहे ओव्हल ग्राऊंड. मुंबईतला सुरवातीचा क्रिकेट याच मैदानावर सुरू झाला. डाव्या हातास दगडी टोलेजंग इमारत दिसते, तिचें नांव आहे हायकोर्ट. १८६१ सालीं ही इमारत बांधण्यांत आली. मुंबापुरींतील एक छानदार इमारत म्हणून ती ओळखली जाते. या इमारतीशेजारींच मुंबई विश्वविद्यालयाची इमारत आहे. या इमारतीचा विस्तार अलीकडेच केलेला आहे. मुंबईतील सर्व महाविद्यालयें या विद्यापीठाशीं संलग्न आहेत व पदवी परीक्षा, इंटर परीक्षा हें विद्यापीठ घेतें. या विद्यापीठाचे आवारांत दोन वास्तु आहेत. एक आहे मुंबापुरीचें भूषण असलेला राजाबाई टॉवर व दुसरी वास्तु म्हणजे कॉनव्होकेशन हॉल.

## राजाबाई टॉवर



• राजाबाई टॉवर

विद्यापीठाच्या आवारांतला राजाबाई मनोरा इ. स. १८७४ सालीं मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपति श्री. प्रेमचंद रायचंद यांनीं आपल्या मातोश्रीच्या स्मरणार्थ उभारला. त्याची उंची २८० फूट असून मुंबईतील सर्वांत उंच इमारत अशी त्याची ख्याति आहे. या मनोऱ्यावर चौथ्या मजल्यावर असलेलें घड्याळ १९३१ पर्यंत व्यवस्थित चाललें. नंतर वारंवार तें बिघडूं लागलें म्हणून १९३१ सालीं नवें विद्युत् घड्याळ बसविण्यांत आलें, तेंच आज चालू आहे. सर सर गिल्बर्ट स्कॉट यांच्या

प्रतिभेंतून ही रचना जन्माला आली. हा चौदाव्या शतकांतील गोएथिक पद्धतीनें बांधण्यांत आला. या मनोऱ्याच्या चोहोंबाजूंना घड्याळाच्या तबकड्या आहेत व लांबूनही त्यांवरील वेळ कळते. या घड्याळासमोर प्रत्येक बाजूला लहानसा सज्जा आहे. तेथून मुंबईचें विहंगम दृश्य दिसतें. वरचा कळस अष्टकोनी आहे. सर्व कोनांवर मिळून चोवीस प्रतिमा आहेत व त्या महाराष्ट्रांतील चोवीस जातींच्या निदर्शक आहेत. संपूर्ण मनोरा सहा मजली असून वरपर्यंत जाण्यास वर्तुलाकार जिने आहेत. मनोरा बांधणीस तीन लक्ष रु. खर्च आला.

विद्यापीठाच्या आवारापासून १२० फुटांवर जुन्या सचिवालयाची इमारत दिसते. याची बांधणी व्हीनिशन गॉथिक पद्धतीची आहे. या इमारतीचा नकाशा २९ सप्टेंबर १८६५ रोजीं कर्नल क्लेअर विल्किन्स यांनीं तत्कालीन राज्यपाल सर बार्टल फ्रियर यांना सादर केला. त्यांनीं तो राणीला सादर केला. लगेच त्यास मंजुरी मिळून १६–४–१८६७ पासून या इमारतीच्या बांधकामास सुरुवात झाली व २०–३–१८७४ रोजीं तें पूर्ण झालें. श्री. वासुदेव बापूजी कीर्तिकर या इमारतबांधणीचे वेळीं असि. इंजिनियर होते. येथून मुंबई राज्याचीं सूत्रें चालविलीं जात असत. सध्यां येथें राज्याच्या कांहीं कचेऱ्या आहेत. इमारतीची लांबी ४७० फूट असून सेल्स टॅक्स कचेरीनें अगदीं वरचा तिसरा मजला व्यापला आहे.

## न वें स चि वा ल य

सचिवालयानंतर डोळ्यांत भरणारी इमारत म्हणजे एलफिन्स्टन कॉलेज व इन्स्टिटयूट ऑफ सायन्स होय. या दोन्ही ठिकाणीं पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांचें शिक्षण दिलें जातें. इन्स्टिटयूट ऑफ सायन्सची स्थापना १९२१ सालीं झाली व शास्त्रीय विषयांचें ज्ञान देणारी एक नामांकित संस्था म्हणून ती ओळखली जाते. यासमोरच बॅंडस्टॅंड आहे. या बॅंडस्टॅंडपासून पश्चिमेस जो थेट समुद्रकांठीं रस्ता

जातो, त्याला फोरशोअर रोड असें म्हणतात. या रस्त्यावर उजवीकडे जी प्रचंड दगडी सहा मजली इमारत दिसते, ती आहे नवें सचिवालय.



• नवें सचिवालय

महाराष्ट्र राज्याचा सारा कारभार येथूनच चालविला जातो. आंत शिरतांच प्रवेशद्वाराजवळ चौकशीची पाटी दिसते व तिथें कोण? कुठें? इत्यादि प्रश्नांचें समाधानकारक उत्तर मिळतें. इमारतीच्या सहाव्या मजल्यावर विविध खात्यांच्या मुख्य मंत्र्यांच्या कचेऱ्या आहेत. पांचव्या मजल्यावर उपमंत्र्यांच्या कचेऱ्या आहेत. या नव्या सचिवालयाला जोडूनच पाठीमागें आणखी एक तशीच इमारत उठवली गेली आहे, तिला 'ॲनेक्सी' असें म्हणतात. महाराष्ट्र राज्याचा व्याप वाढल्यानें त्यासाठीं ही नवी इमारत बांधावी लागली. या इमारतीजवळच विधान-सभेच्या सदस्यांकरितां भव्य वसतिगृह आहे, आणि जवळच स्टँडर्ड व्हॅक्यूम बिल्डिंग आहे. आधुनिक शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून ही अनेक मजल्यांची इमारत ओळखली जाते. हिच्यावर बहुरंगी रोषणाई केली कीं ती इतकी खुलून दिसते म्हणतां! या इमारतीकडे

पाठ करून उभें राहिलें म्हणजे प्रशांत सागराचें दर्शन घडतें. हिंडण्या-फिरण्यास, पाय मोकळे करण्यास, या निवांत स्थळीं हौशी, गुलहौशी मंडळींची जा–ये रात्रौ अकरा वाजेपर्यंत असते. या भागाला नरीमन पॉइंट म्हणतात.

## म्युझियम

या नरीमन पॉइंटवरून आपण आल्या पावलींच इन्स्टिटयूट ऑफ सायन्सपर्यंत माघारें येऊन मग दक्षिणेकडे जाऊं या. वळसा घेतांना मुंबईतील कितीतरी प्रेक्षणीय इमारतींकडे सहजासहजीं लक्ष जातें. इन्स्टिटयूट ऑफ सायन्सच्या अगदीं लगतच कोंपऱ्यावर अर्धवर्तुळाकार



• म्युझियम

दगडी इमारत आहे. तिचें नांव आहे कावसजी जहांगिर हॉल. एका वेळीं या शहरांतलें हें सर्वांत मोठें सभागृह होतें. येथेंच जानेवारी १९४७ त कॅबिनेट मिशनची योजना अखिल भारतीय कॉंग्रेस समितीनें मान्य केली. या हॉलच्या बांधणीस ४००,००० रु. खर्च आला आहे.

या हॉलच्या पूर्वेस लांबलचक अर्धवर्तुळाकार पण बैठी अशी जी इमारत दिसते, ती आहे जहांगिर आर्ट गॅलरी. देशी–विदेशी चित्रकारांच्या रम्य कलाकृतींचें प्रदर्शन नेहमीं येथेंच भरविलें जातें व रसिकही त्यांचें स्वागत करण्यासाठीं नियमितपणें येथें येत–जात असतात. १९५१ सालीं ही आर्ट गॅलरी बांधली गेली व २१ जानेवारी १९५२ रोजीं तिचें उद्घाटन मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. बाळासाहेब खेर यांचे शुभहस्तें करण्यांत आलें. या इमारतीलगतच आहे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम. ही इमारत इंडो सारसेनिक पद्धतीच्या बांधणीची असून ती १९१४ सालीं उभारली गेली. कला, पुराणवस्तु-संशोधन व निसर्गसंपत्ति असे तीन विभाग येथें आहेत. एका वेळचे प्रिन्स आणि प्रिन्सेस ऑफ वेल्स व तदनंतरचे पंचम जॉर्ज व मेरी यांच्या भारतभेटीची कायम स्मृति म्हणून ही भव्य इमारत उभारली गेलेली आहे. अजंठा, वेरुळ, घारापुरी इत्यादि ठिकाणच्या चित्राकृति येथें पाहण्यासारख्या असून कांहीं ऐतिहासिक स्त्रीपुरुषांचे पोषाखही ठेवलेले आहेत. पार्शींचें स्मशान–ज्याला टॉवर ऑफ सायलेन्स म्हणतात त्याची प्रतिकृतीही येथें पहावयास सांपडते. कारण पार्शींशिवाय इतर कोठल्याही जमातीस तिथें जावयास मिळत नाहीं.

या वस्तुसंग्रहालयासमोर कौन्सिल हॉलची दगडी इमारत आहे. महाराष्ट्र राज्य विधान सभेचीं अधिवेशनें येथें होतात. एका काळीं खलाशांचें वसतिगृह म्हणून ही इमारत वापरली जात होती. ही इमारत कस्टम हाऊस रोड व अपोलो बंदर रोड यांच्या अगदीं कोंपऱ्यावर आहे. कौन्सिल हॉलच्या समोर मुंबईतील एक भव्य हॉटेल –मॅजेस्टिक आहे.

## ताज व अपोलो बंदर

चला, कान्सिल हॉलकडून अपोलो बंदर रस्त्यानें पुढें जाऊं या. या रस्त्याच्या टोंकाशीं एक सुंदर वास्तु आहे. तिचें नांव आहे गेटवे ऑफ

इंडिया. पंचम जॉर्ज आणि राणी मेरी यांनीं डिसेंबर १९११ त भारताला भेट दिली त्या भेटीची आठवण म्हणून ही वास्तु उभारण्याचें ठरलें. १९२४ त तिची बांधणी पूर्ण झाली व १२ डिसेंबर १९२४ रोजीं तत्कालीन लाट साहेब लॉर्ड रेडिंग यांचे हस्तें भारताच्या या प्रवेश-द्वाराचें उद्‌घाटन झालें. येथून अथांग सागराचें दर्शन घडतें. सायं-काळच्या वेळीं हिंडण्या–फिरण्यास हौशी मंडळी येथें येतात. लॉंचमधून कांहीं लोक आसमंतांतील दर्यांतून फिरून येतात. पॅरिसच्या आर्क–डी–ट्रॉम्फीची आठवण करून देणारी ही सुंदर इमारत आहे. या प्रवेश-द्वारासमोरच छत्रपति शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. तो २६ जानेवारी १९६१ रोजीं भारताचे संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे तत्कालीन लाडके मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे हस्तें सकाळीं १० वाजून १० मिनिटांनीं उभारला गेला. तो सोहळा अभूतपूर्व होता. इंग्लंडच्या राणीनेंही या प्रसंगीं पुतळ्यास हार अर्पण केला होता. गेटवे ऑफ इंडिया व शिवाजी पुतळा यांच्या जवळच महाराष्ट्रांतलें प्रसिद्ध असें आलीशान भव्य हॉटेल आहे, त्याचें नांव ताजमहाल हॉटेल. पश्चिमेकडील हें प्रमुख हॉटेल समजलें जातें व ताज नांवानें तें ओळखलें जातें. १९०४ सालीं तें बांधलें गेलें व त्याला त्याकाळीं ४५ लक्ष रु. खर्च आला. सर्व



अपोलोबंदर समोरचा शिवाजीचा पुतळा

आधुनिक सुखसोयींनीं हें हॉटेल सुसज्ज आहे. अनेक ब्रिटिश कंपन्यांच्या विशेषतः विमान कंपन्यांच्या कचेऱ्याही येथें आहेत.

अपोलो बंदरावरून परतून रीगल चित्रपटगृहाला वळसा घालून दक्षिणेस कुलाब्याच्या रोखानें चला. वाटेंतल्या ऑर्मिन्टन रोडवर बस कंपनीचें नवें कार्यालय लागतें. आणखी पुढें गेलें कीं कफ परेड विभाग लागतो. श्रीमंत लोकांचे छानदार बंगले येथें दिसतात. येथून आणखी पुढें गेलें कीं ससून डॉक ही गोदी लागते. ही गोदी जुनी असली तरी कोळी लोक तिचा आज मोठ्या प्रमाणावर उपयोग करतात. माशांचा घाऊक व्यापार येथेंच चालतो. येथून बसच्या वाटेनें पुढें गेलें कीं सिंध व अफगाण ( १८३८–४३ ) मोहिमेंत जे शिपाई गडी कामास आले त्यांचे स्मरणार्थ बांधलेलें अफगाण चर्च दिसतें. त्याच्यापुढें सेंट जोसेफच्या नांवानें बांधलेलें रोमनकॅथॉलिक प्रार्थना मंदिर, डाव्या बाजूस कुलाबा वेधशाळा आणि उजव्या बाजूस कुलाबा दीपगृह दिसतात. वेधशाळा पहाण्यास परवानगी घ्यावी लागते.

## संध्याकाळ

चला, आतां आल्या वाटेनेंच परतूंया. दुपार झालेली आहे. तेव्हां म्युझियम जवळच्या एकाद्या चांगल्या उपाहारगृहांत जाऊन भोजन करूं या. थोडी विश्रांति घेऊं या नि दुपारची भटकंती करूं या.

### टा ऊ न हॉ ल

चला, उत्तरेच्या दिशेनें सरळ चला. मघांचा कावसजी जहांगीर हॉल ओलांडला कीं एलफिन्स्टन कॉलेज दिसेल. मुंबईतलें हें सगळ्यांत जुनें कॉलेज. तत्कालीन गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांचें नांव या महाविद्यालयास जें दिलें गेलें आहे, तें अद्याप कायम आहे. मुंबई

विद्यापीठ स्थापन होण्यापूर्वी हें कॉलेज निघालें. त्याच्यापुढें डेव्हिड ससून लायब्ररी व रीडिंग रूम, एअर इंडियाचे मालाचें बुकिंग ऑफिस हीं लागतात. समोरच प्रिन्स ऑफ वेल्सचा अश्वारूढ पुतळा आहे. त्याला काळा घोडा असें म्हणतात. त्यासमोरच पूर्वेकडे एक गोल दुमजली इमारत आहे. ती आहे अगदीं जुनी येथल्या नगरपालिकेची इमारत. काळ्या घोड्याला वळसा घालून पूर्वेकडे जाणाऱ्या रस्त्यास रॅमपार्ट रोड म्हणतात. तेथून थोडें पुढें गेलें कीं कस्टम हाऊस रोड लागतो. त्या रस्त्यावर लायन गेट व रॉयल इंडियन नेव्हीच्या गोद्या आहेत. जवळच जुनें ॲडमिरिल्टी हाऊस आहे. त्याच्याच पुढें ओल्ड कस्टम हाऊस आहे व त्याच्याच नांवानें हा रस्ताही ओळखला जातो. या रस्त्यावर पहाण्याजोगी इमारत म्हणजे टाऊन हॉल. १८२१ सालीं ती बांधण्यास सुरवात झाली व १८३३ मध्यें ती पूर्ण झाली. त्या कामीं ६ लक्ष रु. खर्च आला. ब्रिटिशांचें कंपनी सरकार जेव्हां आलें, तेव्हां मुंबईत टाऊन हॉल नव्हता. भाड्याच्या एका इमारतींत कोर्ट भरे व त्याच इमारतीचा उपयोग टाऊन हॉलसारखा करीत. मुंबईचा व्याप जसजसा वाढूं लागला, तसतशी सभा-समारंभासाठीं कायम सोयीची जागा पाहिजे असें वाटूं लागलें. १७९३ मध्यें हेन्शॉ या सरकारी नोकरानें टाऊन हॉलची कल्पना प्रथम सादर केली. परंतु त्याच्या योजनेचा विचार व्हावयाला दीड तप लागलें. सर जेम्स मॅकिंटॉशनें ही योजना हातीं घेतली. सार्वजनिक सभा-समारंभ, करमणुकीचे कार्यक्रम यांची येथें सोय व्हावी, तसेंच येथें एक ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय असावें अशा प्रकारें विचार सुरू झाला. आरंभीं हा हॉल सार्वजनिक रीत्या निधि उभारून बांधावा असें ठरलें व निधि उभारण्यासाठीं दोनदां सोडती टाकण्यांत आल्या. पण नंतर हें काम सरकारनेंच घेतलें. कर्नल कौपर आर. इ. यांनीं या हॉलची आंखणी केली. प्रशस्त अशा अनेक पायऱ्या चढून गेल्यावर उंच डोरिक पद्धतीच्या स्तंभावर आधारलेल्या या हॉलमध्यें प्रवेश होतो. त्याची आंतील बांधणी कोरिंथियन पद्धतीची आहे. दरबार हॉलसारखें आंतलें

दालन मनावर ठसा उमटविल्याशिवाय राहात नाहीं. आज येथें कलेक्टर कचेरी, स्टँप कचेरी, शिरगणती कार्यालय अशा कचेऱ्या आहेत. शिवाय रॉयल एशियाटिक सोसायटीची मुंबई शाखा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तिच्या ग्रंथालयाचें नामकरण सेंट्रल लायब्ररी असें करण्यांत आलें. आज येथें ज्ञानसाधनेचें वातावरण दिसून येतें. या हॉलच्या पायऱ्यांवरून महत्त्वाचे जाहीरनामे वाचून दाखविण्यांत आलेले आहेत. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर १ नोव्हेंबर १८५८ रोजीं व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा याच पायऱ्यांवरून गव्हर्नरानें वाचून दाखविला होता.

या टाऊन हॉलसमोरच जें सर्कल आहे, त्याला हॉर्निमन सर्कल असें म्हणतात, व तिथेंच जी बाग आहे तिला हॉर्निमन गार्डन म्हणतात. या सर्कलच्या आसमंतांत बँकांच्या कचेऱ्या आहेत. टाऊन हॉलच्या मागील बाजूस जुना मुंबईचा किल्ला आहे. त्याच्याच नांवावरून या विभागाला 'फोर्ट' असें आजही म्हणतात.

किल्ल्याच्या पुढें टांकसाळ लागते व तेथून टांकसाळ रस्ता–मिंट रोड–सुरू होतो. टांकसाळीची जागा ६० हजार चौ. वार असून ती बॅलार्ड रोडपर्यंत पसरलेली आहे. टांकसाळीसमोरच रिझर्व्ह बँकेची १९३३ सालीं बांधलेली सिमेंट–कांक्रीटची मुख्य इमारत दिसून येते. बॅलार्ड रोडनें बॅलार्ड इस्टेट विभागाकडे जातां येतें. येथें देशी परदेशी अनेक कंपन्यांचीं–विशेषतः आगबोट कंपन्यांचीं कार्यालयें आहेत. पुढें जवळच पोर्ट ट्रस्टची कचेरी व डाव्या अंगास कस्टम हाऊस आहे. कस्टम हाऊसच्या पुढें बॅलार्ड पियर गार्डन लागते आणि मग बॅलार्ड पियर धक्का लागतो. या धक्क्यापासून जवळच अलेक्झांड्रा, प्रिन्सेस व व्हिक्टोरिया या तीन गोद्या आहेत. या गोद्यांमधून आलेला माल उतरविला जातो व जाणारा माल चढविला जातो. माल उतरविण्याच्या सर्व आधुनिक साधनांनीं गोद्या सुसज्ज आहेत. बॅलार्ड पियरला वळसा देऊन पश्चिमेच्या रोखानें निघालें कीं विटेट रोड, फोर्ट स्ट्रीट व

फ्रियर रोड हे रस्ते लागतात. फोर्ट स्ट्रीट व फ्रियर रोड जिथें एकत्र मिळतात, तिथें जनरल पोस्ट ऑफिस ( जी. पी. ओ. ) आहे. १९११ सालीं ही इमारत बांधली गेली. या इमारतीचा घुमट प्रेक्षणीय आहे. या इमारतीच्या पश्चिमेस जो चौक आहे, त्याला नगर चौक असें म्हणतात. या नगर चौकाजवळच मध्य रेल्वेचें लोकल व मेल गाड्यांचें अंतिम स्थानक बोरीबंदर-व्ही. टी. आहे. रात्रंदिवस येथें उतारूंची वर्दळ चालू असते. १८७८ पर्यंत हें स्टेशन नुसतें लांकडी होतें, पण त्या वर्षीं तें मोडून १८८८ मध्यें दगडानें बांधलें गेलें. बाहेर गांवीं जाणाऱ्या गाड्यांसाठीं वेगळे फलाट मात्र अलीकडे केलेले आहेत.

## मुंबई महापालिका

बोरीबंदरसमोरच मुंबई महापालिकेची सवागसुंदर इमारत नजरेस पडते. गोथिक धर्तीच्या बांधणीची ही इमारत १८९३ मध्यें बांधली गेली. महापौर व कमिशनर येथेंच बसतात. या शहराची स्वच्छता ठेवण्याचा सारा कारभार येथून चालविला जातो. या इमारतीवरून पुढें दक्षिणेच्या रोखानें गेलें की, या इमारतीचीच नवी जोड इमारत, पुढें एस्प्लनेड कोर्ट, कामा हॉस्पिटल, सेंट झेवियर्स कॉलेज, रंगभवन व एलफिन्स्टन टेकनिकल हायस्कूल या इमारती क्रमानें लागतात. या रस्त्यास क्रूकशँक रोड असें नांव आहे. रंगभवन हें खुलें थिएटर आहे व महाराष्ट्र राज्याच्या अधिकारक्षेत्राखालीं त्याचा कारभार चालतो. या सर्व इमारतींच्या समोर जें विस्तीर्ण मैदान दिसतें, त्याला आझाद मैदान म्हणतात. त्याचें जुनें नांव एस्प्लनेड मैदान. १९३१ त महात्माजींनीं येथूनच असहकारितेची चळवळ सुरू केली, त्या स्मृतिप्रीत्यर्थ त्याचें नांव बदलून आझाद मैदान असें ठेवण्यांत आलें. या मैदानाचे दक्षिण टोंकास बॉम्बे जिमखाना क्लब आहे. मैदानाचे उत्तर टोंकाकडे व समोर पश्चिमेकडे या शहरांतलें आलीशान, भव्य असें मेट्रो थिएटर आहे. या विभागास धोबीतलाव म्हणतात. त्याच्याच पाठीमागें कांहीं



• मुंबई महानगरपालिका

अंतरावर लिबर्टी चित्रपटगृह, शेजारींच बॉम्बे हॉस्पिटल, त्याच्याजवळच गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऑफिसेस, ऑल इंडिया रेडिओची कचेरी व त्यांचे पाठीमागें मुंबईतलें एकमेव तळघरांत असलेलें नाटकांसाठीं सर्व सुखसोयींनीं युक्त असें बिर्ला मातोश्री सभागृह आहे. बिर्ला सभागृहाच्या पाठीमागच्या अंगास जें मोकळें मैदान आहे, त्यास चर्चगेट क्रॉस मैदान म्हणतात. तिथें ख्रिस्ताचा क्रॉस असल्यानें हें नांव मिळालेलें आहे. या मैदानांतून समांतर रस्त्यावरून चालूं लागलों कीं राणीच्या पुतळ्याकडे आपण येतों. या ठिकाणीं मघांचा मेयो रोड व म. गांधी रोड एकत्र मिळतात. म. गांधी रोड पुढें फ्लोरा फाऊंटनकडे जातो. वाटेंत ओरिएन्टल लाइफ इन्शुअरन्स कंपनीची दगडी प्रचंड इमारत लागते. त्याच्याच शेजारीं सिद्धार्थ कॉलेज, थॉमस कुकची दगडी इमारत, जुनी पेटिट लायब्ररी व रीडिंग रूम, पुढें खादी ग्रामोद्योग कार्यालय, लॉइड्स बँक, कोडॅक कंपनी, गॅस कंपनी यांच्या कचेऱ्या व त्यासमोरच शहरांतलें

एक मोठें स्टोअर इव्हॅन्स फ्रेझर हीं सारीं लागतात. हा सरळ रस्ता नगरचौकांतून बोरीबंदरला जातो. तेव्हां पुढें न जातां येथूनच आल्या वाटेनें मागें फ्लोरा फाऊंटनजवळ या. हें सुंदर कारंजें शंभर वर्षांपूर्वी येथें नव्हतें. तिथें पूर्वी दोन दरवाजे होते. सर बार्टल फ्रियर यांच्या सन्मानार्थ हें छानदार कारंजें बांधून त्यावर नक्षीकाम करण्यांत आलें. फ्रियरचेंच पुढें कालांतरानें फ्लोरा असें नामकरण झालें. या कारंजाजवळच १९६२ सालीं हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारला गेलेला हुतात्मा स्तंभ आहे. हुतात्मा स्तंभाला वंदन करून व फ्लोरा फाऊंटनला वळसा घालून पश्चिमेच्या रोखानें सरळ जाऊं या. टोंकाला आपणांला समुद्राचें दर्शन घडतें. या ठिकाणास मरीन ड्राइव्ह असें म्हणतात. वाटेंत ब्रेबॉर्न स्टेडियम लागतें, तेथें क्रिकेटचे सामने होतात. ३५००० प्रेक्षक तिथें एका वेळीं बसतात. समुद्राच्या कांठाकांठानें फिरत फिरत थंड हवा खात खात आपण मरीन लाइन्स ओलांडून चर्नीरोडला येतों.



• फ्लोरा फाऊंटन

वाटेंत तीन–तीन चार–चार मजली अनेक इमारती लागतात व त्यांतून श्रीमंत लोक रहातात. चर्नीरोड स्टेशनजवळ गव्हर्नमेंट सेंट्रल प्रस आहे. सरकारी कागदपत्रांची व प्रश्नपत्रांची छपाई येथेंच होते. त्याजवळच स्वामी कुवल्यानंदांचें कैवल्यधाम व त्याशेजारींच तारापोरवाला मत्स्यालय आहे. श्री. व सौ. विकाजी तारापोरवाला यांच्या देणगीमुळें हें मत्स्यालय अस्तित्वांत आलें आहे. येथें लहान मोठे, रंगी–बेरंगी विविध जातींचे मासे पुष्करिणींतून ठेवलेले आढळतात. त्यांतून रंगीबेरंगी प्रकाशयोजना केलेली असल्यामुळें तर त्यांच्या हालचाली नेत्ररम्य वाटतात. १९५१ सालीं ८ लाख रु. खर्चून ही दुमजली इमारत बांधली गेली. जवळच स्त्रियांसाठीं बांधलेलें नवें वसतिगृह आहे.

चर्नीरोड स्टेशनच्या जवळच दुसरें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे चर्नीरोड बाग व त्या बागेंतच असलेलें बालभवन हें होय. लहान लहान मुलांच्या बौद्धिक व शारीरिक विकासासाठीं वाचनालय, खेळांसाठीं क्रीडांगण, थिएटर, इत्यादि साऱ्या साऱ्या सुखसोयी तिथें आहेत.

चला, आतां येथेंच संध्याकाळ झाली आहे. अंधार पडूं लागला आहे. बरेच फिरून फिरून तुम्ही आतां थकलां दमलां असाल नाहीं ! आतां विश्रांति घेऊं या आणि पुन्हां उद्यां रम्य नगरीचें आणखी दर्शन घेऊं या.

संपला हा पहिल्या दिवशींचा कार्यक्रम.

## दुसरा दिवस–सकाळ

आज आपण बोरीबंदर स्टेशनपासून भटकंतीला सुरुवात करूं या.

स्टेशनच्या समोरच असलेली महापालिकेची भव्य इमारत आपण काल पाहिली. तिच्याच शेजारीं तिमजली दगडी इमारत जी दिसते ती आहे टाइम्स ऑफ इंडिया या प्रसिद्ध वृत्तपत्र संस्थेची. तिच्या शेजारीं

अंजुमान-इस्लाम उर्दू पाठशाळा, सिडेन हॅम कॉलेज ऑफ कॉमर्स, जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् आणि पोलिस कमिशनरची मुख्य कचेरी या इमारती लागतात. या सर्व इमारतींच्या समोर अवाढव्य दगडी लांबच लांब जी इमारत आहे, ती आहे मध्य रेल्वेची. माल वहातुकीच्या अनेक कचेऱ्या नि फलाट या इमारतींत आहेत.

## फुले मार्केट

पोलिस कमिशनरच्या कचेरीसमोर मुंबईतलें प्रसिद्ध असें फुले मार्केट आहे. शिवाजी मार्केट असेंही त्याला म्हणतात. त्याचें जुनें नांव



• फुले मार्केट

क्रॉफर्ड मार्केट. कारनॅक रोड व दादाभाई नौरोजी रोड यांच्या कोंपऱ्यावरच हें मार्केट असून त्यानें २६ हजार तीनशें अठ्ठ्याहत्तर चौरस वार जागा व्यापलेली आहे. १८६९ सालीं तत्कालीन म्युनिसिपल कमिशनर ऑर्थर क्रॉफर्ड यांच्या प्रेरणेमुळें हें अवाढव्य मार्केट

अस्तित्वांत आलें. कोणतीही भाजी, फळें, फुलें, कोणत्याही ऋतूंत येथें मिळतात हें येथलें वैशिष्ट्य होय. त्याशिवाय कोंबड्या, नाना तऱ्हेचे पशुपक्षीही येथें विक्रीस असतात. या मार्केटच्या प्रवेशद्वारा-समोरूनच जो रस्ता पश्चिमेकडे गेला आहे, त्याला कारनॅक रोड म्हणतात. या रस्त्यानें आपण धोबीतलावला येऊं व तिथें वळसा घेऊन उत्तरेला गिरगांव रोडनें पुढें जाऊं. या गिरगांव रोडवर भारी वर्दळ दिसून येते. येथले रस्ते अरुंद असल्यानें तर ती वहातूक नि गर्दी जास्तच भासते. प्रिन्सेस स्ट्रीट व गिरगांव रोड जिथें एकत्र मिळतात तिथें पारशांच आतश बेहराम हें फार जुनें प्रार्थना मंदिर आहे. १७१३ सालीं तें बांधलें गेलें. या गिरगांव रोडवर झावबा राम मंदिर, पोर्तुगीज चर्च हें ख्रिस्ती प्रार्थना मंदिर हीं भाविकांचीं श्रद्धास्थानें आहेत. त्यांना ओलांडून थेट आपण ऑपेरा हाऊसजवळ येतों. ऑपेरा हाऊस हें जुनें नाटकांचें थिएटर, पण आज तें चित्रपटगृह झालेलें आहे. या थिएटरच्या आसमंतांत हिंदी चित्रपट दाखविणारीं आणखीही चित्रपटगृहें आहेत.

## चा पा टी

या ऑपेरा हाऊसला वळसा देऊन पश्चिमेच्या दिशेनें गेलें कीं मुंबईची चौपाटी लागते. मुंबईतल्या रसिकांचें, हौशी जनांचें हें हिंडण्याफिरण्याचें स्थान आहे. येथें छत्री अडकवलेलीं अनेक दुकानें दिसतील, तीं आहेत भेळपुरी-पकोडेवाल्यांचीं दुकानें. वाळूंत खेळणारीं मुलें नि गप्पासप्पांत दंग होऊन गेलेलीं अनेक युगुलें येथें दिसतील, आणि आपल्या गतजीवनाच्या आठवणींचा आढावा घेत बांकावर बसलेले अनेक वृद्धही दिसतील. या चौपाटीवर पहाण्यासारखें जर कांहीं असेल तर तें म्हणजे लो. टिळक व त्यांच्यासमोर विठ्ठलभाई पटेल यांचे असलेले उभे पुतळे. या पुतळ्यांसमोर दगडी दुमजली महाविद्यालय आहे, त्याचें नांव विल्सन कॉलेज. या कॉलेजच्या पाठीमागच्या बाजूस याच



• चौपाटीवरील दृश्य

कॉलेजचें विद्यार्थीवसतिगृह आहे व त्याजवळच भारतीय विद्याभवनाची छानदार इमारत आहे. सभा, संमेलनें, नाटकें, इ. सांस्कृतिक कार्यक्रम येथें नेहमींच चालू असतात. येथला गीता हॉल तर अवश्य पहाण्याजोगा आहे. सुविख्यात गुर्जर साहित्यिक श्री. कन्हैय्यालाल माणेकलाल मुन्शी यांच्या प्रेरणेनेंच ही इमारत उभी राहूं शकली आहे.

## संध्याकाळ

चला, आज जरा लौकरच चौपाटीवरील एकाद्या हॉटेलांत भोजन करूं या. थोडी विश्रांति घेऊं या. मग आपण जाऊंया मलबार टेंकडी-वर. चौपाटीवरूनच असा जो वर चढावाचा गेलेला रस्ता दिसतो, त्याला

मलबार हिल म्हणतात. वाटेंत राज्यपालांचें निवासस्थान व वाळकेश्वर मंदिर हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. राज्यपालांचें निवासस्थान पहाण्यास खास परवानगी लागते व जेव्हां राज्यपाल येथें नसतील तेव्हां ती मिळते. त्यांच्या निवासस्थानाच्या आवारांतला दरबार हॉल प्रेक्षणीय आहे. राज्यपालांसाठीं करण्यांत येणारे खाजगी कार्यक्रम, मेजवान्या, येथें होतात.

## मलबार हिल

मलबार टेंकडीवरचें वाळकेश्वराचें मंदिर ही या शहरांतील सर्वांत जुनी वास्तु. शिलाहार राजांनीं हें मंदिर बांधलें असलें तरी श्रीरामचंद्रांच्या हस्तें येथल्या वालुकेश्वराची स्थापना झालेली आहे अशी श्रद्धा आहे. सध्यांचें हें देऊळ रामाजी कामत या शेणवी गृहस्थानें १८ व्या शतकाच्या सुरुवातीस बांधलें. या देवळानजीक जो तलाव आहे त्याचें नांव बाणगंगा. रामचंद्राच्या येथल्या वास्तव्यांत तेथील पाण्यानें त्यांची तृषा शमेना म्हणून त्यांनीं आपल्या बाणाच्या साहाय्यानें भूमीचा भेद करून तिथें गोड पाण्याचा अखंड झरा निर्माण केला. हा रामबाण पाताळांत घुसला नि तेथील भोगावती नदीच्या फांट्याला वाळकेश्वरीं प्रकट होण्यासाठीं त्यानें वाव करून दिला आणि याच कथेच्या आधारें हा तलाव बाणगंगा, बाणतीर्थ व पाताळगंगा या तीन नांवांनीं ओळखला जातो. बाणगंगेच्या पवित्र परिसरांत आठ देवाल्यें आहेत. मलबार हिलचा माथा मुंबई महापालिकेच्या पाणी खात्यानें व्यापलेला आहे. या जागेंत पाण्याचा सांठा केला जातो. मुंबापुरींतल्या उंचच उंच इमारतींतून पाणी वरपर्यंत चढावें यासाठीं तान्सा, तुळशी या तलावांतून मोठमोठ्या नळांच्या साहाय्यानें शहरांत आणलेलें पाणी या टाकींत प्रथम सांठविलें जातें व तेथून तें ठराविक वेळेला शहरांत सोडलें जातें. अशा या कृतींत कारंजाची योजना आहे. उंच अशा ठिकाणा-

वरून ठराविक दाबाच्या साहाय्यानें पाणी सोडलें असतां दुसऱ्या बाजूस तें तितक्याच उंचीवर चढूं शकतें अशी ती योजना आहे. ही पाण्याची भव्य टाकी वरून चांगली आच्छादित असून तीवर सुंदर व विस्तीर्ण अशी बाग थाटली आहे. अर्थात् ही बाग अधांतरीं असल्या-मुळेंच तिला " हँगिंग गार्डन " हें नांव मिळालें. कालांतरानें तिला सर फेरोजशहा मेहता गार्डन हें नांव देण्यांत आलें. त्याच नांवानें सध्यां ती ओळखली जाते. १८८९ मध्यें ही बाग बांधून पूर्ण झाली.

## कमला नेहरू पार्क

या बागेच्या समोरच डोंगराच्या ऐन कड्यावर कमला नेहरू पार्क नांवाची विविध प्रकारच्या रंगीबेरंगी पुष्पलतांनीं बहरलेली बाग आहे. १९५२ सालीं ती बांधण्यांत आली. आज ही बाग मुलांचें अत्यंत आवडतें स्थान बनलें आहे. या बागेचें सर्वांत मोठें आकर्षण म्हणजे त्यांतील म्हातारीचा बूट! युरोपियन बालवाङ्मयांत अमर झालेल्या म्हातारीच्या बुटाची कल्पना घेऊन तशा बुटाच्या आकाराची एक छोटेखानी, आटोपशीर एक मजली इमारत या बागेंत उभारण्यांत आली असून ही शिल्पकृति पाहाण्यासाठीं व तिच्या वरच्या सज्जांत चढून सभोंवतालच्या दृश्याचें निरीक्षण करण्यासाठीं लहान मुलांची धांव नेहमींच तिथें असते. या बुटांतून मुंबापुरीचें नयनमनोहर दृश्य दिसतें.

मलबार टेंकडीच्या पाण्याच्या सांठ्यापलीकडील म्हणजे वाळकेश्वराच्या विरुद्ध बाजूस कोणत्याही प्रकारची वास्तु नाहीं. तिथें कांहींशी झाडी दिसते. तिथें आहे टॉवर ऑफ सायलेन्स म्हणजे पार्शी लोकांची स्मशानभूमि.

मलबार टेंकडीच्या ज्या नाक्यापासून आपण भ्रमंतीला सुरुवात केली, त्या नाक्याला 'तीन बत्ती' असें म्हणतात. टेंकडीवरील ज्या मुख्य रस्त्यानें आपण वाटचाल केली, त्या रस्त्याला रिज रोड असें नांव आहे.

आंग्लभाषेंत रिज याचा अर्थ डोंगरमाथा. याच रस्त्याचा पुढील भाग गिब्स रोड या नांवानें परिचित आहे. मलबार हिलवरच्या रिज रोडवर बहुतेक सर्व मंत्र्यांचीं निवासस्थानें आहेत. अनेक थोरामोठ्या व्यक्तींचीं निवासस्थानें पण येथेंच आहेत.

रिज रोडवरून गिब्स रोड व गिब्स रोडनें या टेंकडीच्या पायथ्याशीं आपण आलों कीं तिथें पांच रस्ते एकत्र मिळतात. हा नाका केम्पूस कॉर्नर या नांवानें ओळखला जातो. अनेक वर्षांपासून केम्पूस आणि कंपनीचें औषधांचें दुकान येथें आहे हेंच त्याचें खरें कारण होय. हा टापूही आपल्याला उंच दिसतो याचें कारण टेंकडी हें होय. या टेंकडीला खंबाला हिल म्हणतात. या टेंकडीच्या पलीकडेच गवालिया तळ्याच्या बाजूला असलेल्या टेंकडीला फॉर्जेट हिल म्हणतात. या मलबार, खंबाला व फॉर्जेट या तिन्ही टेंकड्या मिळून जो डोंगर होतो, त्याला वाळकेश्वराचा डोंगर असें पूर्वीं म्हणत असत.

आतां आपण केम्पूस कॉर्नरपासून निघून खंबाला टेंकडी उजवीकडे सोडून तिच्या व मलबार टेंकडीच्या मधल्या खिंडींतून निघालों कीं पश्चिमेकडे समुद्रबाजूला जाणारा नेपियन्सी रोड हा पहिला रस्ता लागतो. या रस्त्याच्या पुढें थोड्याच अंतरावर उजव्या हाताला उत्तरेकडे जाणारा आडवा रस्ता फुटतो. हा रस्ता गेलीं कित्येक वर्षं वॉर्डन रोड व आज भुलाभाई रोड या नांवानें ओळखला जातो. भुलाभाई देसाई हे एक प्रख्यात कायदेपंडित, उत्कृष्ट वक्ते व कॉंग्रेसचे नामांकित पुढारी होऊन गेले. ते या रस्त्यावरच रहात, त्यामुळें त्यांची स्मृति या रस्त्याला देण्यांत आलेली आहे. चार्लस वॉर्डन हे सुद्धां जुन्या काळांतले सनदी नोकर होते. मुंबई सरकारचे सेक्रेटरी व पुढें ईस्ट इंडिया कंपनीचे डायरेक्टर अशीं उच्च स्थानें त्यांनीं भूषविलीं होतीं. कंपनी सरकारच्या कालांत मुंबईतील जमिनी-वतनांसंबंधीं जे वाद माजले, त्यांत वॉर्डननीं दिलेले मौलिक निर्णय मान्य करण्यांत आले होते.

पहा हा भुलाभाई देसाई रोड. खंबाला टेंकडीस प्रदक्षिणा घालीत घालीत तो थेट हॉर्नबी व्हेलार्डपर्यंत जातो. तिथेंच त्याच्या बाजूस महालक्ष्मीची टेंकडी आहे. या टेंकडीच्या पायथ्याशीं खंबाला हिलवरून येणारा पेडर रोडही त्याला येऊन मिळतो. हा पेडर रोड खंबाला हिलच्या मधोमध दक्षिणोत्तर व आरपार जाणारा रस्ता आहे.

महालक्ष्मी टेंकडीच्या अलीकडेच भुलाभाई देसाई रोडवर ब्रीच कँडी हें ठिकाण आहे. ब्रीच म्हणजे भगदाड—समुद्राच्या पाण्यानें भूभागांत पडलेलें—व कँडी म्हणजे खिंड या शब्दाचा आंग्ल अवतार. येथें प्रेमीजन आणि हौशी लोक फिरायला येतात.

हॉर्नबी व्हेलार्डच्या नाक्यावर भुलाभाई देसाई रोडच्या जोडीला आणखी तीन रस्ते एकत्र होतात. एक हॉर्नबी व्हेलार्डवरून उत्तरेस वरळीकडे जातो. दुसरा क्लार्क रोड—तो पूर्वेस महालक्ष्मी रेसकोर्सच्या बाजूनें व पुढें जेकब सर्कलचा छेद करीत भायखळ्याकडे जातो व तिसरा ताडदेव रोड हा खंबाला हिलला प्रदक्षिणा घालीत दक्षिणेकडे नाना चौकापर्यंत जातो. तिथ त्याला गवालिया टँक



• श्रीमहालक्ष्मी मंदिर

हा आडवा रस्ता मिळतो. हा गवालिया टँक रोड पश्चिमाभिमुखी होऊन जात असल्यामुळें तोही खंबाला हिलला प्रदक्षिणा घालून केम्प्स कॉर्नरकडे येतो व अशा प्रकारें खंबाला हिलभोंवतींची आपण केलेली प्रदक्षिणा पूर्ण झाली.

हॉर्नबी व्हेलार्डजवळ पहाण्यालायक अशीं दोन तीन ठिकाणें आहेत. पहिलें आहे महालक्ष्मी मंदिर. या देवळांत मुंबापुरीची धनदेवता श्रीमहालक्ष्मी व तिच्या दोघी बहिणी श्रीमहाकाली व श्रीमहासरस्वती अधिष्ठित आहेत. या देवता याच जवळच्या समुद्रांत सांपडलेल्या होत्या. महालक्ष्मीच्या सोबतीला येथें धाकलेश्वर, राम, मारुती, महादेव, भीमनाथ, कालिका, विठोबा–रुखमाई, रेमेश्वरी इत्यादि देवतांचीं देवळें आहेत. कांहीं मठ व धर्मशाळा पण तिथें आहेत.

हॉर्नबी व्हेलार्डच्या पश्चिमबाजूस महालक्ष्मी मंदिराजवळच देऊळ व वरळीचा बांध या दोन भागांत अडकवलेल्या पाण्यांत एका खडकावर एक कबर आहे ती हाजी अलि किंवा मामा हजानी या नांवानें ओळखली जाते. हा अवतारी पुरुष लोकांच्या कल्याणार्थ नेहमीं झटत असे. येथल्या समुद्राला कितीही भरती आली तरी पाणी कबरीला कधींच स्पर्श करीत नाहीं.



• रेसचें मैदान

हाजी अलीपासूनची थेट डांबरी सडक वरळीस जाते. जातांना समोर उजवीकडे रेसकोर्स आहे. हें रेसचें मैदान जगांतलें एक उत्कृष्ट मैदान म्हणून ओळखलें जातें. याजवळच वेलिंग्टन स्पोर्टस् क्लब आहे.

हॉर्नबी व्हेलार्डजवळच वल्लभभाई पटेल स्टेडियम आहे. या शहरांतलें हें दुसरें भव्य क्रीडांगण. १९५२ सालीं तें बांधण्यांत आलें व सरदार पटेलांचें नांव त्यास देण्यांत आलें. हॉकी व फुटबॉलचे सामने येथें होतात. त्याशिवाय कुस्त्यांचे जंगी फड येथें हरहमेशा गाजतात. या स्टेडियमसमोरच कांहींशा पाण्यांत ग्वाल्हेरच्या व बडोद्याच्या महाराजांचे टुमदार बंगले आहेत.



• नॅशनल स्पोर्टस क्लब

चला, आतां संध्याकाळ झाली. अंधारही हळूहळू पडत चालला. वरळीच्या बांधावरून फिरत फिरत आपण वरळी नाक्यापर्यंत आलों आहोंत. नाक्यापासूनचा पूर्वेकडे जाणारा रस्ता थेट महालक्ष्मी स्टेशनाकडे जातो. वाटेंत फिल्म लॅबोरेटरी आणि बोहऱ्यांचें स्मशान लागतें

एवढेंच काय तें. त्या रस्त्याच्या विरुद्ध दिशेस जो रस्ता दिसतो तो थेट माहिमपर्यंत जातो. चला, याच रस्त्यानें पुढें गेलांत कीं वळणावर जपानी बौद्ध मंदिर लागेल व त्याच्याच पुढें आयुर्वेदिक इस्पितळ आहे. त्याचें नांव आहे रामबिलास आनंदीलाल पोदार आयुर्वेदिक रुग्णालय. आयुर्वेदिक शिक्षणाची सोयही याच रुग्णालयाला जोडलेल्या महाविद्यालयातर्फे होते. बुद्ध मंदिरापाशीं दोन रस्ते झालेले दिसतात. एक रस्ता पश्चिमेस थेट वरळीच्या समुद्रावर किंवा चौपाटीवर घेऊन जातो. दुसऱ्या रस्त्यानें पुढें गेलें कीं वाटेंत ग्लॅक्सो लॅबॉरेटरी, रॅपटॅकॉस लॅबॉरेटरी या औषधी कंपन्यांच्या प्रयोगशाळा लागतात. जवळच कांहीं अंतरावर कृत्रिम रेशमावर संशोधन करणारी एक प्रचंड संशोधन संस्था आहे. त्याच्यापुढें बेंगाल केमिकल हा औषधी कंपनीचा कारखाना आहे. आतां आपण आलों आहोंत त्या विभागाला प्रभादेवी असें म्हणतात. या विभागांत असलेलें प्रभादेवीचें मंदिर प्रेक्षणीय आहे. चला तिचें दर्शन घेऊं. ही मुंबईतील एक जुनी देवता, विशेषतः आग्री-कोळी-प्रभु जमातीची ही कुळदेवता आहे. दरवर्षीं तिचा उत्सव साजरा होत असतो.

चला, तिचें दर्शन घेतलेंत. आतां पुन्हां मघांच्याच रस्त्यावर या. आणि कोंपऱ्यावरच्या किस्मत टॉकीजवरून पुढें चला. वाटेंत मध्येंच एक पेट्रोल पंप लागेल, तिथें दोन रस्ते झालेले दिसतात. एक रस्ता आहे कॅडल रोड व दुसरा रस्ता आहे आगर बझार. हे दोन रस्ते जिथें फुटतात तिथेंच आहे श्रीसिद्धिविनायकाचें मंदिर. मुंबईतलें हें जुनें गणपतीचें उजव्या सोंडेच्या मूर्तीचें मंदिर. याच आगर बझार रोडनें पुढें जाऊन दादर पोर्तुगीज चर्चजवळ आपण येऊं. येथें चार रस्ते फुटलेले दिसतात. एक आपण आतां आलों तो पश्चिमेकडचा आगर बझार, पूर्वेकडे जाणारा सी. के. बोले रोड, उत्तरेकडे व दक्षिणेकडे जाणारा गोखले रोड. गोखले रोडनें उत्तरेकडे आपण शिवाजी पार्कला

येऊंया. उत्तर मुंबईतलें हें एक विस्तीर्ण मोकळें मैदान आहे. सरकारी, निमसरकारी नि बिन सरकारी असे अनेक कार्यक्रम येथें होत असतात. जवळच 'बालमोहन विद्या-मंदिर' ही मुंबईतीलच नव्हे तर अखिल महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध अशी शिक्षण संस्था आहे. एक साधे प्राथमिक शिक्षक प्रयत्नानें नि शिक्षणप्रसाराच्या तळमळीनें काय करूं शकतात याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ही तिमजली लांबच लांब छानदार शिक्षणसंस्थेची इमारत होय.



• वरळी येथील श्री बुद्ध मंदिर

आतां खूपच अंधार झाला आहे. आजची ही दुसऱ्या दिवसाची भ्रमंती येथेंच थांबवूंया.

## तिसरा दिवस

आज आपल्या भ्रमंतीचा तिसरा दिवस. आज आपण कालच्याच शिवाजी पार्कपासून पुढें सुरुवात करूंया.

शिवाजी पार्क जवळच्या आयलंडला वळसा घालून आपण पुढें

उत्तरेकडे जाऊं या. या रस्त्याला लेडी जमशेटजी रोड असें म्हणतात. सिटीलाइट, पॅरेडाइज हीं रस्त्यावरचीं दोन चित्रपटगृहें ओलांडून आपण माहिम बस स्टेशनपाशीं आलों आहोंत. या बस स्टेशनच्या जवळच पश्चिमेकडे तोंड करून असलेलें प्रसिद्ध प्रार्थना मंदिर आहे, त्याचें नांव सेंट मायकेल चर्च. या ख्रिस्ती प्रार्थना मंदिराचे समोरच पण कांहींशा अंतरावर मुसलमानांचेंही एक पवित्र स्थान आहे. त्याला म्हणतात मुगदम बाबाचा दर्गा. या दर्ग्यांतील कबरी मायलेंकरांच्या आहेत. येथें दरवर्षीं उरूस भरतो.

माहिम बस टर्मिनस, दर्गा व प्रार्थना मंदिर पाहून माहिम चौपाटी-वर आपण जाऊं या. याला माहिम कॉजवे म्हणतात. येथून जी थेट डांबरी सडक गेलेली दिसते तिला घोडबंदर रोड असें नांव आहे. या रस्त्यानें आपल्याला थेट दहिसरपर्यंत जायचें आहे हं!



• माऊंट मेरी चर्च

माहिम पाठीमागें टाकल्यावर आपल्याला लागतें वांद्रें. येथें पहाण्याजोगें म्हणजे माऊंट मेरी चर्च. मोतमावली असें पण तिला म्हणतात. माऊंटमेरीचें येथें वास्तव्य बरेंच जुनें म्हणजे पोर्तुगीज कालापासूनचें आहे. तिनें अनेक चमत्कार करून दाखविलेले असल्यानें अनेक भाविकांची तिजवर श्रद्धा आहे.

दरवर्षीं आक्टोबर–नोव्हेंबरच्या सुमारास तिचा उत्सव भरविला जातो. वांद्र्यालाच मुसलमानांचीही एक जंगी मशीद आहे.

वांद्र्याजवळून अलीकडेच नवा तयार केलेला 'वेस्टर्न हायवे' निघतो. मोठ्या मालवाहू गाड्या या रस्त्यानें नेल्या जातात. वांद्र्याचा खाटीकखाना हा मुंबईतला सर्वांत मोठा खाटीकखाना समजला जातो. याच्या खालोखाल खाटीकखाना कुर्ला येथें आहे.

वांद्र्याच्या पुढचें स्टेशन म्हणजे खार रोड व त्यानंतर सांताक्रूझ व पुढें विले पारलें. आज सांताक्रूझ–विले पारलें परिसराला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. याचें कारण येथें असलेला विमानतळ. येथें लांबलचक व भव्य इमारत उभी आहे, ती आहे या विमानतळावरची. देशोदेशींचे पुढारी, उद्योगपति, साहित्यिक, पत्रपंडित, पुढारी इत्यादि अनेकांचे पाय मुंबईत प्रथम येथें टेंकतात. मुख्य इमारतीच्या दोन बाजू आहेत. डाव्या बाजूला डोमेस्टिक ट्रॅफिक म्हणजे अंतर्गत वाहतुकीसाठीं दालन तर उजव्या बाजूला इंटरनॅशनल ट्रॅफिक म्हणजे आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठीं दालन. याशिवाय आणखी पलीकडे बड्या व्यक्तींसाठीं व्ही. आय. पी. रूम व परदेशी पाहुण्यांसाठीं इंटरनॅशनल अरायव्हल्स अशीं दालनें आहेत. अगदीं अलीकडे डाव्या अंगाला अग्निशामक दल सदैव खडें असतें. इंटरनॅशनल अरायव्हलसच्या दालनांत जगांतल्या महत्त्वाच्या अशा अल इतालियापासून बी. ओ. ए. सी. पर्यंत विमान वाहतूक कंपन्यांचे काऊंटर्स आहेत. पण सर्वांत मोठा व सदैव गर्दी असलेला काऊंटर एअर इंडिया इंटरनॅशनलचा होय. या इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या समोर असलेल्या लॉनभोंवतीं मोटार गाड्यांची नेहमींच रांग दिसून येते.

सांताक्रूझहून जुहू येथें आपण जाऊं या. सांताक्रूझपासून तिथें जाण्यास बस आहे. सांताक्रूझच्या पूर्वेस जुहू आहे. येथून दिसणारा अथांग दर्या; आजूबाजूला असलेलीं नारळीचीं झाडें, यामुळें येथला परिसर रम्य वाटतो. सुटीच्या दिवसांत फिरण्यासाठीं येथें अनेक लोक

येतात. चैनी नि विलासी लोकांसाठीं येथें हॉटेल्सही आहेत. एक दोन दिवस तिथें रहातांही येतें. जुहू येथें कार्तिक पौर्णिमेस तर मनस्वी गर्दी होते व रात्रभर येथें मौजमजा चाललेली असते. चंद्राच्या शीतल प्रकाशांत दुग्धप्राशनच नव्हे, तर विविध प्रकारच्या खाद्य पदार्थांवरही ताव मारतांना मित्रमंडळी दिसून येतात.

सांताक्रूझनंतर अंधेरी व जोगेश्वरी. अंधेरी रेल्वे स्टेशनपासून जुहू-सारख्याच रम्य ठिकाणीं जातां येतें. त्या स्थळास वरसोवा असें म्हणतात. येथें मच्छिमारी पण चालते. जोगेश्वरी स्टेशनाचे पूर्वेस सुमारें मैलावर प्रसिद्ध अशीं कोरींव लेणीं आहेत. त्यांना जोगेश्वरी केव्हज किंवा गुंफा असें म्हणतात. त्यांचा काल इ. स. च्या सातव्या शतका-पर्यंत जातो. येथें दगडांत कोरलेलें शिवमंदिर आहे, पण कालानुसार आज त्याची बरीचशी पडझड झाली आहे. जोगेश्वरीच्या पुढें गोरेगांव. आरें येथें जाण्यासाठीं जोगेश्वरी व गोरेगांव यांपैकीं कुठूनही जातां येतें.

गोरेगांवनंतर लागतें मालाड. येथें अनेक चित्रपट कंपन्यांचे स्टुडिओ आहेत. ते विशेषतः मालाड स्टेशनाचे पूर्वेस आहेत. मालाडचा समुद्रकांठ निसर्गसौंदर्यपरिपूर्ण आहे व तेथून आणखी एका रम्य स्थळीं मार्वे—मनोरीस जातां येतें. मार्वे समुद्रकिनारा मालाड स्टेशनापासून अवघ्या चार मैलांवर आहे व उजवीकडे मनोरी आहे. मार्वे व मनोरी यांचेमध्यें खाडी आहे व एका तीरावरून दुसरीकडे जाण्यासाठीं बोटीची सोय आहे. मालाड रेल्वे स्टेशनापासून मार्वे येथें जाण्यासाठीं नियमित बस वहातूक आहे.

मालाडनंतर कांदीवली व बोरीवली हीं स्थानकें लागतात. बोरीवली-जवळ येतांच पश्चिमेकडे पहा. समोरच एका उंच टेंकडीवर मनोऱ्या-वरचा एक पुतळा दिसेल. एका काळचा मंडपेश्वराचा हा भग्नावशेष आहे. आज त्याला माऊंट पोईसर असें म्हणतात. दगड कोरून

केलेलें येथलें मंदिर जोगेश्वरीच्या मंदिराच्या समकालीन आहे. पोर्तुगीजांनीं मुंबई जिंकतांच त्या मंदिरावर आजच्या चर्चची उभारणी केली. आज हें ठिकाण व आसमंतांतील टापू रम्य नि हवा खाण्याचें ठिकाण म्हणून ओळखला जातो.

चला, आतां दुपार झाली आहे. आज आपण बोरीवली स्टेशनाचे आसपास एखाद्या चांगल्या भोजनगृहांत भोजन करूंया, व नंतर थोडी विश्रांति घेऊन बोरीवलीच्या पूर्वेस जाऊंया.

## संध्याकाळीं

बोरीवली स्टेशनाचे पूर्वेस आणखी कांहीं कोरींवलेणीं आहेत. त्यांना 'कान्हेरी केव्हज' असें म्हणतात. येथें जाण्यासाठीं बोरीवली स्टेशनापासून रविवार नि सुटीच्या दिवशीं बसेस असतात. एरवींच्या दिवशीं टांगे मिळतात. जातांना डावीकडे वाटेंत श्रीकृष्णनगर ही नवी वसाहत लागते. त्यानंतर कान्हेरी नॅशनल पार्क किंवा कृष्णगिरी उपवन लागतें. अत्यंत आधुनिक पद्धतीनें या उपवनाचा विकास केलेला असून तें सध्यां पद्धतशीर ठेवलें आहे. सुटीच्या दिवशीं रपेट करण्यास अनेक लोक येतात. येथें भाड्यानें राहण्यासाठीं खोल्याही मिळतात. उपवन सोडलें कीं वाटेंत ओढे, नाले, झाडें, झुडपें लागतात आणि लगेच लेण्यांच्या सान्निध्यांत आपण येऊन पोंचतों. उपवनापासून सुमारें तीन मैलांवर हीं लेणीं आहेत. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं डोंगरांत खोदलेल्या या शिल्पकृति आजही सुस्थितींत आहेत. येथें एकंदर १०९ गुंफा आहेत, त्यांपैकीं क्रमांक १, २ व ३ ह्या विशेष प्रेक्षणीय आहेत. बाकी बरींचशीं लेणीं छोटीं छोटीं असून तीं सामान्य आहेत. येथून मुंबई उपनगराचें मोठें विहंगम दृश्य दिसतें.

चला, बोरीवलीहून आपण आतां माघारी अंधेरीस येऊं या. आज आपण सारी पश्चिम मुंबई–चर्चगेट ते बोरीवलीपर्यंतची–धांवती भेट देऊन पाहिली. आतां आपण अंधेरीहून विहार तलावाकडे जाऊंया. त्यासाठीं अंधेरी स्टेशनाचे पूर्वेस उतरून तिथें कुर्ला गोल बिल्डिंग अशी पाटी असलेल्या बसमध्यें बसून साकी नाक्याकडे उतरूंया आणि विहार तलावाकडे जाऊंया. मुंबईच्या उत्तरेस सुमारें १६ मैलांवर हा शहराला पाणीपुरवठा करणारा तलाव आहे. सभोंवतीं रम्य वनश्री आहे. इ. स. १८४४ सालपर्यंत मुंबईत असलेल्या उथळ विहिरी व कांहीं तलाव यांवरच मुंबईची पाण्याची गरज भागत असे. परंतु वाढत्या लोकवस्ती-मुळें हें पाणी पुरेनासें झालें व १८४५ सालीं पाण्यासंबंधीं शहरांत ओरड सुरू झाली. अनेक सूचना पुढें आल्या व शेवटीं कॅप्टन क्रॉफर्ड, ले. डिलाइल व मि. कोनिबियर यांनीं विहार तलावाचें पाणी नळानें आणण्याची योजना मंजूर केली व १८६० पासून त्या योजनेचा लाभ मिळूं लागला. सुमारें ७० लक्ष गॅलन पाण्याचा पुरवठा रोज त्या वेळीं शहराला होऊं लागला. परंतु मुंबईतील वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या मागणीला तो अपुरा पडूं लागला. म्हणून १८७९ मध्यें तुळशी तलाव बांधण्यांत आला. शहरापासून तो २० मैलांवर आहे. या तलावाची योजना मि. रसेल एटकिन्सन यांनीं १८६८ मध्यें केली होती. या तलावा-मुळें मुंबईला रोज १७० लक्ष गॅलन पाणी मिळूं लागलें. त्यानंतर नगर-पालिकेनें तान्सा तलावाची योजना हातीं घेतली. हा तलाव मुंबईपासून ५५ मैलांवर आहे व तो पश्चिम घांटाच्या पायथ्याशीं आहे. या तिन्ही तलावांतून मोठमोठ्या नळांवाटे पाणी मुंबईत आणलें जातें. मुंबई शहराला तान्सा, तुलसी व विहार या तलावांतून पाणी प्रामुख्यानें मिळतें. या तिन्ही तलावांसभोंवतालची शोभा मोठी प्रेक्षणीय आहे.

चला, आज आपल्या तिसऱ्या दिवशींची भ्रमंति या तलावांच्या पहाण्यानें संपवूं या.

# चौथा दिवस

आज आपल्या भ्रमंतीचा चौथा दिवस. आज आपण सुरुवात करूंया क्रॉफर्ड मार्केटपासून. या मार्केटला महात्मा फुले मार्केट असें म्हणतात. फळें, फुलें, भाजीपाला, प्राणी वगैरेप्रमाणेंच येथें कापडाचेंही मोठें मार्केट आहे. त्याला मंगळदास मार्केट म्हणतात. या शहरांतलें हें सर्वांत मोठें मार्केट. याच्या खालोखाल कापडाचें मार्केट माटुंग्यास किंग सर्कल पुलापाशीं उघडलेलें आहे. त्याचें नांव आहे गांधी मार्केट.

मंगळदास मार्केटजवळ शेख मेमन स्ट्रीट व प्रिन्सेस स्ट्रीट जिथें एकत्र मिळतात, तिथें आहे या शहरांतली सर्वांत मोठी मुसलमानांची मशीद. तिचें नांव आहे जुम्मा मशीद. प्रिन्सेस स्ट्रीटवर औषधी विक्रेत्यांचीं दुकानें आहेत. कांहीं होमिओपॅथिक दवाखाने पण येथें आहेत. शेख मेमन स्ट्रीटवर कापड खरेदी–विक्रीचा फार मोठा व्यापार चालतो, व त्यासाठीं तिथें लक्ष्मीदास मार्केट व मूळजी जेठा मार्केट अशीं दोन मार्केटस् आहेत. १८७२ सालीं न्यू पीस गुडस् बझार कंपनी लि. येथेंच



● मुंबादेवी मंदिर

प्रथम स्थापन झाली. त्यापुढेंच उजव्या हातास मुंबापुरीची ग्रामदेवता मुंबादेवी हिचें देवालय आहे. त्यानंतर बुलियन एक्सचेंज व त्याजवळच काळबादेवी रोडवर तांब्यापितळेच्या व ॲल्युमिनियमच्या भांड्यांचीं असंख्य दुकानें आहेत. आणि म्हणूनच कीं काय, या विभागास तांबाकाटा असें म्हणतात. या विभागांत नेहमींच गर्दी असते आणि कांहीं कांहीं वेळां चालणें सुद्धां अशक्य होऊन बसतें.

आतां आपण पुन्हां आल्या वाटेनें परत माघारे क्रॉफर्ड मार्केटपर्यंत येऊं आणि मग थेट उत्तरेकडे जाणाऱ्या रस्त्यानें पुढें सरळ जाऊं. या रस्त्याला नांव आहे महमदअली रोड. या रस्त्याला हें नांव खिलाफत चळवळींतले प्रसिद्ध अली बंधूंपैकीं महमदअली यांचे नांवावरून देण्यांत आलें आहे. या महमदअली रोडवर कांच सामानाचीं, फर्निचरचीं दुकानें आहेत. याच रस्त्यावर आणखी एक मशीद आहे, तिला जकेरिया मशीद असें नांव आहे. त्यापुढें जे. जे. इस्पितळ लागतें. या शहरांतलें हें सर्वांत मोठें रुग्णालय. आज या रुग्णालयाचा व्याप वाढलेला आहे आणि म्हणून या मूळ रुग्णालयाला जोडूनच नवी इमारत बांधलेली आहे. या रुग्णाल्याला जोडूनच जें वैद्यकीय महाविद्यालय आहे, त्याला म्हणतात ग्रँट मेडिकल कॉलेज. डॉक्टरीचें शिक्षण देणारें हें शहरांतलें महाविद्यालय होय. जे. जे. हॉस्पिटल व ग्रँट मेडिकल कॉलेज ज्या विभागांत आहेत, त्या विभागास भायखळा असें म्हणतात.

या इस्पितळावरून आपण आणखी पुढें गेलों कीं भायखळा पूल लागतो व पुलाच्या पायथ्याशींच फायरब्रिगेडचें मुख्य कार्यालय एका रस्त्याच्या कोपऱ्यावर लागतें. त्या रस्त्याला सांखळी स्ट्रीट म्हणतात. त्यासमोरच पारशाचा उभा पुतळा आहे. महमदअली रोडच्या सुरवातीपासून तों या पुलापर्यंतच्या भागांत बहुतेक सारी वस्ती मुसलमानांची आहे. पूल उतरला कीं एक ख्रिस्ती प्रार्थना मंदिर लागतें. त्याचें नांव ग्लोरिया चर्च. समोर मशीद आहे व लगतच मारुतीचें देऊळही आहे.

या मारुतीला दंग्यामारुती म्हणतात. कारण मुंबईतले अनेक दंगे या मंदिर–मशिदींवरून उद्भवलेले आहेत. जवळच सेंट्रल रेल्वेचें भायखळा रेल्वे स्टेशन, त्याच्यापुढें रेल्वेवाटे माल वाहून नेण्याकरितां उघडण्यांत आलेलें स्थान–गुडस् डेपो, लगतच रेल्वेचें इस्पितळ हीं लागतात.

या इमारतीसमोरच मुंबापुरींतलें एक प्रेक्षणीय असें स्थान आहे. तें म्हणजे राणीचा बाग. या बागेची जमीन ४८ एकर आहे. त्यापैकीं २४ एकर जमिनींत बगीचा असून बाकीच्या २४ एकर जमिनींत प्राणिसंग्रहालय आहे. बागेची रचना कलात्मक, मनोहारी नि आकर्षक अशी आहे. २४ एकर जागेत ४८ पिंजरे असून त्यांपैकीं ३६ पिंजऱ्यांत पशु व १२ पिंजऱ्यांत पक्षी ठेवण्यांत आलेले आहेत. हरण, सांबर, काळवीट, माकडें, कोल्हा, झेब्रा, उंट, जिराफ, अस्वल यांसारखे पशु; सिंह, वाघ, डुक्कर, वगैरे-सारखीं हिंस्र श्वापदें; पोपट, मैना, कोकिळा, बुलबुल, शामा, हॉर्नबील, मोर, रॉबिन, मॅकॉव, कबुतरें वगैरेसारखे पक्षी; साप, सुसर, घोरपड, कांसव वगैरे सरपटणारे प्राणी या संग्रहालयांत ठेवण्यांत आलेले आहेत. या बागेच्या चोहोंबाजूंस लोखंडी गजांचें कुंपण असून पश्चिमेस भव्य प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वारावरील कमानीचा खर्च रुस्तमजी जीजीभाई यांनीं केला. लोखंडी गजांच्या आवरणाचा खर्च जगन्नाथ शंकरशेट व प्रेमाभाई हेमाभाई यांनीं केला. ता. १९ नोव्हेंबर १८६२ रोजीं लेडी फ्रियर यांचे शुभहस्तें राणीचा बाग जनतेकरितां खुला करण्यांत आला.

व्हिक्टोरिया गार्डन ऊर्फ राणीच्या बागेच्या कमानी दरवाजांतून आंत गेल्यावर डावीकडच्या अंगास इटालियन स्थापत्य रचनेनें बांधलेली छानदार इमारत आहे, तिला ‘ व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट म्युझियम ’ म्हणतात. या इमारतीला चार लक्ष तीस हजार रु. खर्च आला. ता. १९ नोव्हेंबर १८६२ रोजीं सर बार्टल फ्रियर यांचे हस्तें या इमारतीचा कोनशिला समारंभ होऊन मे १८७२ मध्यें सर सिमॉर फिट्झेरॉल्ड यांचे हस्तें इमारतीचें उद्घाटन झालें. या इमारतीच्या

अनेक भव्य दालनांत पुराणकालीन वस्तूंचा संग्रह करण्यांत आलेला आहे. या बागेच्या बाहेरच्या कंपाऊंडमध्यें दाराजवळच निळ्या दगडांचा एक चौथरा असून त्यावर ६७ फूट उंच मनोरा आहे व त्याच्या चोहोंबाजूंस जमिनीपासून ४२ फुटांवर ४ घड्याळांच्या तबकड्या आहेत. हा मनोरा बांधण्याकरितां ५१ हजार ६५३ रु. खर्च आला. त्यांपैकीं ३० हजार रुपये श्री. डेव्हिड ससून यांनीं दिले आणि यामुळें त्या घड्याळाच्या मनोऱ्यास त्यांचेंच नांव—'डेव्हिड ससून क्लॉक टॉवर' असें देण्यांत आलें आहे.

राणीच्या बागेकडे आपण थोडी विश्रांति घेऊंया, भोजन करूंया आणि मग दुपारच्या भ्रमंतीला सुरुवात करूंया.

राणीच्या बागेपासून तों थेट परळ—नायगांव विभागापर्यंत बहुसंख्य सारी वस्ती गिरणी कामगारांची दिसून येते. या विभागांत अनेक गिरण्याही आहेत. येथील इमारती उंचच उंच, जुन्या थाटाच्या, बुरसटलेल्या, कित्येक वर्षांत रंग, सफेती, दुरुस्ती इत्यादि न केलेल्या दिसून येतात.

लालबागला कांद्या—बटाट्यांचा व्यापार चालतो. या विभागांत हिंदूंचे सारेच उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. विशेषतः गणेशोत्सव तर येथें चांगलाच साजरा करतात. लालबागच्या नाक्यावरून मुख्य रस्त्यानें सरळ न जातां त्याच रस्त्यास समांतर अशा असलेल्या रस्त्यानें गेलें कीं त्या रस्त्यावर लवजी कॅसल आहे. एका काळीं गव्हर्नमेंट गेस्ट हाऊस येथें होतें. सध्यां येथें श्री. व्ही. शांताराम यांचा राजकमल स्टुडिओ आहे. या रस्त्यास गव्हर्नमेंट गेट रोड असें म्हणतात. राजकमल स्टुडिओच्या पुढेंच खास प्राण्यांसाठीं उघडलेलें ॲनिमल हॉस्पिटल, व्हेटरनरी कॉलेज, किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल व त्यालाच संलग्न असलेलें गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज इत्यादि मुंबईतील प्रमुख इमारती लागतात. किंग एडवर्ड

रोडकडे वळतांच उजव्या हातास हॉफकिन इन्स्टिटयूट लागते. डॉ. विल्डेमार मोरडेकाय हॉफकिन या रशियन शास्त्रज्ञाचें नांव या प्रमुख संशोधनात्मक संस्थेस देण्यांत आलें आहे. येथें प्लेगवर, सर्पविषावर, कुत्र्याचे व आणखी कांहीं प्राण्यांचे विषावर उतार पाडणारी प्रतिबंधक लस टोंचली जाते. या संस्थेच्या पुढें एक आडवा रस्ता सोडून दोन हॉस्पिटलें लागतात. एकाचें नांव नौरोजी वाडिया मॅटरनिटी हॉस्पिटल व दुसऱ्याचें नांव बाई जेरबाई वाडिया हॉस्पिटल फॉर चिल्ड्रेन. याच जेरबाई वाडिया रोडवर भारतांतील एकमेव असें टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल आहे. येथील विज्ञानशाखेंत किरणोत्सर्गाचा अभ्यास केला जातो. याच्या पाठीमागच्या बाजूस कांहीं अंतरावर अगदीं अलीकडे उघडण्यांत आलेलें गांधी मेमोरियल हॉस्पिटल आहे. नौरोजी वाडिया हॉस्पिटल व मुलांसाठींच्या जेरबाई वाडिया हॉस्पिटल यांच्या-समोरच असलेल्या गोखले सोसायटी लेनमध्यें कामगार मैदान आहे. सार्वजनिक व राजकीय सभा येथें नेहमींच होत असतात. समोरच हाजी बचुअली डोळ्यांचें हॉस्पिटल आहे. परळच्या मुख्य नाक्यास पोयबावडी नाका म्हणतात. येथून एक रस्ता परळ स्टेशन, एलफिन्स्टनरोड स्टेशन येथें जातो.

परळवरून आपण दादरवर येतों. वाटेंत रंगमंदिर हें खुलें नाट्यगृह नायगांव क्रॉस रोडवर कोहिनूर मिलपाशीं आहे. त्याच्याच जवळ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचें वाचनालय व संदर्भशाखा आहे. मराठींतील बहुतेक सारीं जुनीं जुनीं मासिकें, पुस्तकें येथें बसून वाचावयास मिळतात. दादर खोदादाद सर्कलवरून आपण माटुंग्यास जाऊंया. एका वेळचा हा दलदलीचा विभाग होता; पण सध्यां येथें सुंदर सुंदर इमारती बांधल्या गेल्या आहेत. येथली बहुसंख्य वस्ती गुजराती आढळते. माटुंग्याला भारत कापूस समिति आहे. त्यातर्फे कापसावर प्रयोग केले जातात.

मुंबई विद्यापीठाची माटुंग्याला असलेली रसायन प्रयोगशाळा जगप्रसिद्ध आहे. तिथें सर्व प्रकारच्या अद्ययावत् उपकरणांनीं सुसज्ज अशा प्रयोगशाळा आहेत. व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट ही नामांकित संस्था पण येथेंच आहे. डॉन बॉस्को, रुइया व खालसा या शिक्षण संस्था पण येथें आहेत. माटुंग्याच्या मुख्य नाक्यास किंग सर्कल असें म्हणतात. येथें जें सुंदर उद्यान अलीकडे तयार करण्यांत आलेलें आहे, त्याचें नांव महेश्वरी उद्यान. या उद्यानाला वळसा घालून आपण शीवला जाऊंया. वाटेंत लोकमान्य टिळक हॉस्पिटल लागतें. शीव येथें बसचें टर्मिनस जंक्शन आहे. जवळच टेंकडीवर ब्रिटिशांनीं बांधलेला जुना किल्ला आहे व जवळच लेडी ऑफ गुड काउन्सेलचें चर्च आहे. हें चर्च फ्रॅन्सिस्कन पंथाच्या भिक्षूंनीं इ. स. १५८० त बांधलें. शीव येथून चेंबूर, मानखुर्द, तुर्भे येथें जाण्यासाठीं बसेस नियमितपणें सुटत असतात. चेंबूरची सारी वस्ती अगदीं अलीकडची आहे. तुर्भे येथें दोन अणुभट्ट्या आहेत. एका भट्टीचें नांव अप्सरा व दुसरीचें नांव भारत कॅनडा भट्टी. तिथें देशांतील व परदेशांतील शास्त्रज्ञ काम करीत असतात. या प्रयोगशाळा भारत सरकारच्या अणुशक्ति खात्यातर्फे चालविल्या जातात.

शीववरून कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडूप, मुलुंड या ठिकाणीं बसेस्नें जातां येतें. परंतु येथें कांहीं प्रेक्षणीय अशीं स्थानें नाहींत. फक्त विक्रोळीजवळ टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस ही आशियांतील मोठी अशी संशोधन संस्था आहे एवढेंच काय तें. कुर्ल्यापासून तों थेट मुलुंडपर्यंतच्या मार्गावर प्रिमियर ऑटोमोबाइल्स, कमाणी, मुकुंद आयर्न, सिबा, 'बूटस्, आगफा, होस्टश्च इ. कारखाने आहेत.

चला, आज आपण आपली मुंबापुरीची भ्रमंती येथें संपवूंया.



## बृहन्मुंबईतील बस वहातूक

**रूट ( A ) क्रमांक १ :** ( कुलाबा बसस्टेशन ते माहिम ) वुडहाऊस रोड, किट्रीज रोड, इलेक्ट्रिक हाऊस, कुलाबा रोड, कुलाबा कॉजवे, रीगल सिनेमा, म्युझियम, काळा घोडा, म. गांधी रोड, फ्लोराफाऊंटन, बोरीबंदर स्टेशन, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, महमदअली रोड, जकेरिया मशीद, भेंडीबाजार, इब्राहीम रहिमतुल्ला रोड, जे. जे. हॉस्पिटल, भायखळा पूल, भायखळा रेल्वे स्टेशन, राणीचा बाग, लालबाग, परळ-पोयबावडी, डॉ. आंबेडकर रोड, दादर ट्रॅमटर्मिनस, टिळक पूल, प्लाझा, शिवाजीपार्क, हरिनिवास, लेडी जमशेटजी रोड—माटुंगा, सिटी लाइट, शीतळादेवी मंदिर, पॅरेडाइज, माहिम.

**रूट ( A 1 ) क्रमांक २ :** ( इलेक्ट्रिक हाऊस ते माहीम ) मेरी वेदर रोड मार्गानें—ऑर्थर बंदर रोड, कुलाबा कॉजवे, महात्मा गांधी रोड,

दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, महमद अली रोड, सर इब्राहीम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड, टिळकपूल, लेडी जमशेटजी रोड, हरिनिवास, शिवाजीपार्क रोड क्र. ५, कॅडल रोड, शीतळादेवी मंदिर, लेडी जमशेटजी रोड, माहिम.

**रूट ( A 2 ) क्रमांक ३** : (फोर्ट मार्केट ते भायखळा पूल) बॅलार्ड रोड मार्गानें–स्प्रॉट रोड, विटेट रोड, फोर्ट स्ट्रीट, बोरीबंदर, दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, महमदअली रोड, सर इब्राहिम रहिमतुल्ला रोड, नेसबिट रोड, माझगांव रोड, माऊंट रोड, व्हिक्टोरिया रोड, डॉ. आंबेडकर रोड, भायखळा पूल.

**रूट ( A 3 ) लिमिटेड, क्रमांक ४** : ( फ्लोराफाऊंटन ते अंधेरी रेल्वे स्टेशन–पश्चिम ). वॉडबी रोड मार्गानें–दादाभाई नौरोजी रोड, पलटन रोड, महमदअली रोड, सर इब्राहिम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड, टिळक पूल, लेडी-जमशेटजी रोड, माहिम, माहिम कॉजवे, घोडबंदर रोड, अंधेरी रेल्वे स्टेशन ( पश्चिम ).

**रूट ( A 4 ) क्रमांक ५** : ( सचिवालय ते सायन ) फोर शोअर रोड मार्गानें–बँड स्टँड, क्विन्स रोड, दिनशा वाच्छा रोड, जमशेटजी टाटा रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, वीर नरीमन रोड, फ्लोरा फाऊंटन, दादाभाई नौरोजी रोड, बोरीबंदर, क्रुकशँक रोड, धोबीतलाव, काळबादेवी रोड, पायधुणी, सर इब्राहिम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड, दादर, किंग सर्कल, सायन हॉस्पिटल, सायन जंक्शन.

**रूट ( A 5 ) लिमिटेड, क्रमांक ६** : (इलेक्ट्रिक हाऊस ते रिफायनरीज )—मेरी वेदर रोड मार्गानें–गार्डन रोड, कुलाबा कॉजवे, महात्मा गांधी रोड, वॉडबी रोड, दादाभाई नौरोजी रोड, पलटन रोड, महमदअली रोड, सर इब्राहिम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड,

किंगसर्कल, सायन हॉस्पिटल, सायन, वॉटर फ्रंट रोड, चेंबूर कॉलनी, मरोली चर्च, वाशी नाका, कॉरिडर रोड, रिफायनरीज.

**रूट ( A 6 ) लिमिटेड क्रमांक ७ :** ( फ्लोरा फाऊंटन ते घाटकोपर रेल्वे स्टेशन–पश्चिम ). बॉडवी रोड मार्गानें–दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, महमदअली रोड, सर इब्राहिम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड, किंगसर्कल, सायन हॉस्पिटल, सायन, मुंबई आग्रा रोड, कुर्ला पोस्ट कचेरी, कुर्ला बस डेपो, जयंतीलाल वैष्णव रोड, घाटकोपर ( पश्चिम ).

**रूट ( A 7 ) लिमिटेड, क्रमांक ८ :** ( इलेक्ट्रिक हाऊस ते चेंबूर रेल्वे स्टेशन–पश्चिम ). मेरी वेदर रोड मार्गानें–गार्डन रोड, कुलाबा कॉजवे, महात्मा गांधी रोड, वॉडबी रोड, दादाभाई नौरोजी रोड, पलटन रोड, महमदअली रोड, सर इब्राहिम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड, किंग सर्कल, सायन हॉस्पिटल, सायन, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, चेंबूर नाका, सेंट्रल ॲवेन्यू ते चेंबूर रेल्वे स्टेशन ( पश्चिम ).

**रूट ( A 8 ) क्रमांक ९ :** ( म्युझियम ते किंगसर्कल ). महात्मा गांधी रोड, दादाभाई नौरोजी रोड, क्रूकशँक रोड, धोबीतलाव, काळबादेवी रोड, पायधुणी, भेंडीबाजार, सर इब्राहिम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड, लेडी जहांगीर रोड, पांच गार्डन्स्, वडाळा रेल्वे स्टेशन, रफी अहमद किडवाई रोड, किंग सर्कल.

**रूट ( A 9 ) लिमिटेड, क्रमांक १० :** ( फ्लोरा फाऊंटन ते घाटकोपर रेल्वे स्टेशन–पश्चिम ). महात्मा गांधी रोड, धोबीतलाव, काळबादेवी, पायधुणी, जे. जे. हॉस्पिटल, डॉ. आंबेडकर रोड, किंग सर्कल, सायन हॉस्पिटल, मुंबई–आग्रारोड, कुर्ला पोस्ट कचेरी, जयंतीलाल वैष्णव रोड, घाटकोपर रेल्वे स्टेशन ( पश्चिम ).

**रूट ( B ) क्रमांक १२१ :** ( कुलाबा बसस्टेशन ते ताडदेव ) कुलाबा रोड मार्गानें–कुलाबा कॉजवे, म्युझियम, महात्मा गांधी रोड,

फ्लोरा फाऊंटन, वीर नरीमन रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेराहाऊस, सॅन्डहर्स्ट पूल, ह्यूजेस रोड, हार्वे रोड, गोवालिया टँक रोड, भुलाभाई देसाई रोड, हॉर्नबी वेलार्ड ( पश्चिम ), ताडदेव रोड ते ताडदेव.

**रूट** ( B 1 ) **क्रमांक** १२२ : ( बॅलार्ड पियर ते हार्कनेस रोड ). बॅलार्ड रोड मार्गानें—मिंटरोड, हॉर्निमन सर्कल, वीर नरीमन रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट पूल, ह्यूजेस रोड, हार्वे रोड, गोवालिया टँक रोड, भुलाभाई देसाई रोड, नेपियन्सी रोड, हार्कनेस रोड.

**रूट** ( B 2 ) **क्रमांक** ४०१ : ( गोवालिया टँक ते माझगांव ). ( ट्रॉली बस फक्त ). गोवालिया टँक रोड, फ्रियर पूल, ग्रँट रोड, बाबुला टँक रोड, हॅन कॉक पूल, माजगांव.

**रूट** ( C ) **क्रमांक** १२३ : ( रोमन कॅथालिक चर्च ते ताडदेव ). अफगाण चर्च मार्गानें–कुलाबा बस स्टेशन, कुलाबा रोड, कुलाबा पोस्ट कचेरी, वुड हाऊस रोड, किट्रीज रोड, कुलाबा कॉजवे, रिगल, म्युझियम, म. गांधी रोड, फ्लोरा फाऊंटन, वीर नरीमन रोड, नेताजी सुभाष रोड, मरीन ड्राइव्ह, चौपाटी, स्विमिंग बाथस्, चौपाटी सी फेस, विल्सन कॉलेज, हार्वे रोड, नाना चौक, ताडदेव रोड ते ताडदेव ट्रॅम टर्मिनस.

**रूट** ( D ) **क्रमांक** ६१ : ( बॅलार्डपियर–बोरीबंदर ते माहीम ) बॅलार्ड रोड मार्गानें–स्प्रॉट रोड, डुगल रोड, विटेट रोड, फोर्ट स्ट्रीट, बोरीबंदर, दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, धोबीतलाव, काळबादेवी रोड, प्रिन्सेस स्ट्रीट, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, लॅमिंग्टन रोड, मुंबई सेंट्रल, जेकब सर्कल, ऑर्थर रोड, लालबाग, डॉ. आंबेडकर रोड, दादर ट्रॅम टर्मिनस, टिळक पूल, शिवाजी पार्क, हरिनिवास, लेडी जमशेटजी रोड, माहिम.

**रूट** ( E ) **क्रमांक** १०१ : ( म्यूझियम–बोरीबंदर ते मलबारहिल ).

अपोलो स्ट्रीट मार्गानें—मेयो रोड, ओल्ड कस्टम हाऊस रोड, बँक स्ट्रीट, हॉर्निमन सर्कल, वीर नरीमन रोड, फ्लोरा फाऊंटन, दादाभाई नौरोजी रोड, बोरीबंदर, क्रूकशँक रोड, धोबीतलाव, काळबादेवी रोड, पायधुणी, भेंडी बाजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी सी फेस, वाळकेश्वर रोड, तीन बत्ती, मलबार हिल.

**रूट ( E 1 ) क्रमांक** १०२ : (कारनॅक बंदर ते मलबारहिल). फ्रियर रोड मार्गानें—मशीद बंदर रोड, मुंबादेवी, पायधुणी, भेंडी बाजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, गोलपिठा, फॉकलंड रोड, ग्रँटरोड कॉर्नर, ग्रँटरोड, नाना चौक, हार्वे रोड, चौपाटी सी फेस, वाळकेश्वर रोड, मलबार हिल.

**रूट ( E 2 ) क्रमांक** १२४ : (कुलाबा बस स्टेशन ते जेकब सर्कल). वुडहाऊस रोड मार्गानें—किट्रीक रोड, कुलाबा कॉजवे, म्युझियम, महात्मा गांधी रोड, फ्लोरा फाऊंटन, दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, धोबीतलाव, काळबादेवी रोड, पायधुणी, सर इब्राहीम रहिमतुल्ला रोड, जे. जे. हॉस्पिटल, दिमतिमकर रोड, नवा नागपाडा, बेलासिस रोड, ताडदेव ट्रॅम टर्मिनस, ताडदेव रोड, हॉर्नबी वेलार्ड, क्लॉर्क रोड, जेकब सर्कल.

**रूट ( F ) क्रमांक** ६२ **:** ( फ्लोरा फाऊंटन ते माहिम ). महात्मा गांधी रोड मार्गानें—बॉम्बे जिमखाना, धोबी तलाव, पहिला मरीन रस्ता, क्वीन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, लॅमिंग्टन रोड, बॉम्बे सेन्ट्रल स्टेशन, बेलासिस रोड, नवा नागपाडा, क्लेअर रोड, भायखळा पूल, हेन्स रोड, डिलाईल रोड, सयानी रोड जंक्शन, गोखले रोड, शिवाजी पार्क रोड क्रमांक ३, रानडे रोड, कॅडल रोड, शीतळादेवी टेंपल रोड, लेडी जमशेटजी रोड, माहिम.

**रूट ( F ) लिमिटेड, क्रमांक** १२ : ( बॅलार्ड पिअर ते जुहू चर्च ). बॅलार्ड रोड मार्गानें—स्प्रॉट रोड, विटेट रोड, ( येतांना ग्रॅहॅम रोड, दुगल रोड, विटेट रोड, ) फोर्ट स्ट्रीट, बोरी बंदर, पलटन रोड, महमद

अली रोड, सर इब्राहीम रहिमतुल्ला रोड, डॉ. आंबेडकर रोड, परळ ट्रॅम टर्मिनस, एलफिन्स्टन रोड, गोखले रोड, लेडी जमशेटजी रोड, माहिम, माहिम कॉजवे, घोडबंदर रोड, वांद्रे टॉकीज, विठ्ठलभाई पटेल रोड, जुहू रोड, जुहू चर्च.

**रूट ( G ) क्रमांक ६३** : ( नाना चौक ते किंग सर्कल ). ताडदेव रोड मार्गानें—ताडदेव ट्रॅम टर्मिनस, बेलासिस रोड, नवा नागपाडा, क्लेअर रोड, भायखळा पूल, हेन्स रोड, डिलाईल रोड, सयानी रोड जंक्शन, गोखले रोड, दादर पोर्तुगीज चर्च स्ट्रीट, डिसिल्व्हा हायस्कूल, टिळक पूल, दादर ट्रॅम टर्मिनस, कात्रक रोड. वडाळा रेल्वे स्टेशन–( पश्चिम ), रफि अहमद किडवाई रोड, किंग सर्कल.

**रूट ( G 1 ) क्रमांक १६१** : ( टाटा ऑइल मिल्स ) – ( शिवडी ते वडाळा रेल्वे स्टेशन – पूर्व ). हे बंदर रोड मार्गानें–शिवडी रेल्वे स्टेशन, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट ऑइल डेपो रोड, फोर्ट रोड, सॉल्ट पॅन रोड ( मिठागर रोड ), अँटॉप हिल रोड, वडाळा रेल्वे स्टेशन.

**रूट ( G 2 ) क्रमांक ६४** : ऑपेरा हाऊस ते किंग सर्कल–लॅमिंग्टन रोड मार्गानें–फ्रियर ब्रिज, नाना चौक, ताडदेव रोड, ताडदेव ट्रॅम टर्मिनस, बेलासिस रोड, नवा नागपाडा, क्लेअर रोड, भायखळा पूल, डॉ. आंबेडकर रोड, जिजीभाय लेन, परळ गव्हर्नमेंट गेट रोड, के. ई. एम. रोड, परळ ट्रॅम टर्मिनस, डॉ. आंबेडकर रोड, दादर ट्रॅम टर्मिनस, कात्रक रोड, वडाळा चर्च, माटुंगा रोड, किंग सर्कल.

**रूट ( G 3 ) क्रमांक १२५** : ( कुलाबा बस स्टेशन ते ताडदेव ट्रॅम टर्मिनस ). वुड हाऊस रोड मार्गानें–किट्रीज रोड, ( परत येतांना कुलाबा रोडनें ) कुलाबा कॉजवे, म्युझियम, महात्मा गांधी रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, प्रार्थना समाज, चर्नीरोड, बाळाराम स्ट्रीट, फोरास रोड जंक्शन, फॉकलंड रोड, ताडदेव ब्रिज, ताडदेव ट्रॅम टर्मिनस.

**रूट ( G 4 ) क्रमांक** ६५ : ( म्युझियम ते किंग सर्कल ). महात्मा गांधी रोड मार्गानें—फ्लोरा फाऊंटन, दादाभाई नौरोजी रोड, बोरीबंदर, क्रुकशँक रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, चर्नीरोड, प्रार्थना समाज, चर्नीरोड जंक्शन, बाळाराम स्ट्रीट, फोरास रोड, बेलासिस रोड, क्लेअर रोड, भायखळा पूल, डॉ. आंबेडकर रोड, परळ, दादर, किंग सर्कल.

**रूट ( G 5 ) क्रमांक** १२६ : ( नरीमन पॉइंट ते ताडदेव ट्रॅम टर्मिनस ). फोर शोअर रोड मार्गानें—नरीमन पॉइंट, सचिवालय, मेयो रोड, म्युझियम, महात्मा गांधी रोड, फ्लोरा फाऊंटन, बोरीबंदर, क्रुकशँक रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, चर्नीरोड, प्रार्थना समाज, चर्नीरोड जंक्शन, ग्रँट रोड, फ्रियर ब्रीज, नाना चौक, ताडदेव रोड, ताडदेव ट्रॅम टर्मिनस.

**रूट ( H ) क्रमांक** १०३ : ( कुलाबा बस स्टेशन ते मलबारहिल ) कुलाबा रोड मार्गानें ( परत येतांना किट्रीज रोडनें ) कुलाबा कॉजवे, म्युझियम, महात्मा गांधी रोड, फ्लोरा फाऊंटन, बोरीबंदर, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, ठाकुरद्वार रोड, खत्तरआळी लेन, सी. पी. टँक, विठ्ठलभाई पटेल रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी सी फेस, वाळकेश्वर रोड, तीनबत्ती, मलबारहिल.

**रूट ( H 1 ) क्रमांक** १०४ : ( कुलाबा बस स्टेशन ते मलबारहिल हँगिंग गार्डन ) एच्. रूटप्रमाणेंच. फक्त धोबीतलावनंतर महात्मा गांधी रोडनें फ्लोरा फाऊंटन.

**रूट ( I ) क्रमांक** १६२ : ( शिवडी रेल्वे स्टेशन ते वरळी व्हिलेज ) किंग एडवर्ड रोड मार्गानें—परळ ट्रॅम टर्मिनस, एलफिन्स्टन रोड, सयानी रोड, प्रभादेवी, बंगाल केमिकल्स, कॅडल रोड, नेवरहूड रोड, कोळीवाडा रोड, वरळी व्हिलेज.

**रूट ( I 1 ) क्रमांक** १६३ : ( शिवडी टी. बी. हॉस्पिटल ते वरळी व्हिलेज ) जेरबाई वाडिया रोड मार्गानें—हॉस्पिटल एवेन्यू, किंग एडवर्ड

रोड, परळ ट्रॅम टर्मिनस, एलफिन्स्टन रोड, सयानी रोड, कॅडल रोड, बेंगाल केमिकल्स, नेबरहूड रोड, वरळी कोळीवाडा, वरळी व्हिलेज.

**रूट (I 2) सर्व्हिस** : (परळ ट्रॅमटर्मिनस ते वरळी डी. डी. चाळ) एलफिन्स्टन ब्रिज रोड, प्रभादेवी, बेंगाल केमिकल्स, ग्लॅक्सो लॅबॉरेटेरीज व बी. डी. डी. चाळ. (तेथून पुढें टी. बी. हॉस्पिटल) ग्लोब मिल्स पॅसेज मार्गानें–डिलाइलरोड, एलफिन्स्टन रोड व ब्रिज, परळ ट्रॅम टर्मिनस्, किंग एडवर्ड रोड, हॉस्पिटल एवेन्यू, जेरबाई वाडिया रोड, टी. बी. हॉस्पिटल.

**रूट (J) क्रमांक** १६५ : (जेकब सर्कल ते सायन) महालक्ष्मी पुलाच्या मार्गानें–हेन्स रोड, वरळी नाका, वरळी डी. डी. चाळ, ग्लोब मिल्स् पॅसेज, डॉ. ॲनी बेझंट रोड, बेंगाल केमिकल्स, कॅडल रोड, प्रभादेवी, आगरबाजार, दादर पोर्तुगीजचर्च स्ट्रीट, डिसिल्व्हा हायस्कूल, टिळक पूल, डॉ. आंबेडकर रोड, खोरघाट रोड, एडनवाला रोड, किंग सर्कल, सायन हॉस्पिटल, सायन रोड, सायन.

**रूट (J 1) क्रमांक** १६६ : (माहिम ते सायन) मोरी रोड मार्गानें–रेल्वे क्रॉसिंग, धारावी रोड, सायन रेल्वे, सायन ब्रिज, सायन.

**रूट (J 3) सर्व्हिस** : (माहिम ते शीव–सायन). लेडी जमशेटजी रोड मार्गानें–शिवाजी पार्क, प्लाझा, टिळक पूल, डॉ. आंबेडकर रोड, लेडी जहांगीर रोड, पांच गार्डन्स, वडाळा चर्च, वडाळा रेल्वे स्टेशन, रफी अहमद किडवाई रोड, स्किम नं. ५७, रोड नं. ९, माटुंगा रोड, किंग सर्कल, सायन हॉस्पिटल, जैन सोसायटी, सायन रोड, सायन.

**रूट (K) क्रमांक** १२७ : (म्युझियम–फ्लोरा फाऊंटन ते गिरगांव प्रार्थना समाज). महात्मा गांधी रोड मार्गानें–धोबी तलाव, गिरगांव रोड, प्रिन्सेस स्ट्रीट, क्विन्स रोड, ठाकुरद्वार, गिरगांव रोड, चर्नी रोड, प्रार्थना समाज.

**रूट (K 1) क्रमांक १२८** : (फलोरा फाउंटन ते फोरास रोड जंक्शन). दादाभाई नौरोजी रोड मार्गानें—बोरी बंदर, क्रूकशँक रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, चर्नीरोड, प्रार्थना समाज, चर्नीरोड जंक्शन, बाळाराम स्ट्रीट, फोरास रोड जंक्शन.

**रूट (K 2) क्रमांक १२९** : (फोर्ट मार्केट ते फोरास रोड जंक्शन). मिंट रोड मार्गानें—बोरीबंदर, क्रूकशँक रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, चर्नीरोड, बाळाराम स्ट्रीट, फोरास रोड जंक्शन.

**रूट (L) व (L 1) क्रमांक १३१ व १३२** : (फोर्ट मार्केट ते फोर्ट मार्केट – रिंग सर्व्हिस). मिंट रोड मार्गानें—हार्निमन सर्कल, वीर नरीमन रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, क्विन्स् रोड, प्रिन्सेस स्ट्रीट, काळबादेवी रोड, मुंबादेवी, मशीद बंदर रोड, कार्नाक बंदर, फ्रियर रोड, फोर्ट मार्केट. ही चक्री सर्व्हिस फोर्ट मार्केट पासून सुरू होऊन वीर नरीमन रोड, चर्चगेट स्टेशन इ. वरून जाते. ती 'एल्' रूट या नांवानें ओळखली जाते. त्याचप्रमाणें फोर्ट मार्केट पासून निघून फ्रियर रोड, कार्नाक बंदर या मार्गानें जाणारी चक्री सर्व्हिस "एल वन" या नांवानें ओळखली जाते.

**रूट (L 2) क्रमांक १३३** : (फ्लोरा फाऊंटन ते मुंबादेवी). महात्मा गांधी रोड मार्गानें—धोबीतलाव, काळबादेवी रोड, मुंबादेवी.

**रूट (M) क्रमांक ४१** : (भाऊचा धक्का ते ऑपेरा हाऊस). कार्नाक बंदर मार्गानें—पश्चिम रेल्वे गुडस् डेपो, कारनॅक रोड, कार्नाक बंदर, धोबीतलाव, गिरगांव रोड, गिरगांव चर्च, चर्नी रोड, न्यू क्विन्स् रोड, ऑपेरा हाऊस.

**रूट (M 1) क्रमांक ४२** : (भाऊचा धक्का ते ताडदेव ट्राम टर्मिनस). कार्नाक बंदर मार्गानें—कारनॅक बंदर, फ्रियर रोड, वाडी बंदर, सरदार वल्लभभाई पटेल रोड, ऑपेरा हाऊस, केनेडी ब्रीज, नाना चौक, ताडदेव रोड, ताडदेव टी. टी.

**रूट (N) क्रमांक** ६६ : (बॅलार्ड पियर–बोरीबंदर ते सायन). बॅलार्ड रोड मार्गानें–(परत येतांना दुगल रोड मार्गानें) फोर्ट मार्केट, मिंट रोड, बोरीबंदर, दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, चर्नी रोड, न्यू क्विन्स् रोड, ऑपेरा हाऊस, लॅमिंग्टन रोड, बॉम्बे सेंट्रल, जेकब सर्कल, आर्थर रोड, लालबाग, डॉ. आंबेडकर रोड, किंग सर्कल, सायन हॉस्पिटल, सायन.

**रूट (N 1) क्रमांक** १६८ : (टाटा ऑइल मिल्स्, शिवडी ते किंग सर्कल). हे बंदर रोड मार्गानें–सिव्हल हिल अॅवेन्यू, रे रोड, रे रोड रेल्वे स्टेशन, व्हिक्टोरीया रोड, डॉ. आंबेडकर रोड, भायखळा पूल, हेन्सरोड, वरळी नाका, वरळी चाळ रोड, वरळी डी. डी. चाळ, ग्लोब मिल्स् पॅसेज, डॉ. अॅनी बेझंट रोड, बेंगाल केमिकल्स्, कॅडल रोड, खेडगल्ली, गोखले रोड (दक्षिण), भवानीशंकर रोड, दादर रेल्वे स्टेशन, टिळक पूल, डॉ. आंबेडकर रोड, खारेघाट रोड, एडनवाला रोड, किंग सर्कल.

**रूट (N 2) क्रमांक** ६७ : (ऑपेरा हाऊस ते किंग सर्कल). लॅमिंग्टन रोड मार्गानें–बॉम्बे सेंट्रल, जेकब सर्कल, आर्थर रोड, डिलाइल रोड, करी रोड, डॉ. आंबेडकर रोड, परळ ट्रॅम टर्मिनस्, दादर मेन रोड, दादर रेल्वे स्टेशन (मध्यरेल्वे), लखमसी नप्पू रोड, रुइया कॉलेज, भांडारकर रोड, तेलंग रोड, भाऊ दाजी रोड, किंग सर्कल.

**रूट (O) क्रमांक** ८१ : (बॅलार्ड पिअर, फ्लोरा फाऊंटन ते माहिम). बॅलार्ड रोड, मार्गानें–सचिवालय, जमशेटजी टाटा रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, वीर नरीमन रोड, फ्लोरा फाऊंटन, दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, धोबीतलाव, पहिला मरिन रस्ता, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, ह्यूजेस रोड, केम्पस् कॉर्नर, भुलाभाई देसाई रोड, महालक्ष्मी मंदिर, हाजी अलि, हॉर्नबी वेलार्ड, वल्लभभाई पटेल स्टेडियम्, वरळी नाका, प्रभादेवी रोड, गोखले रोड

( उत्तर ), शिवाजी पार्क, लेडी जमशेटजी रोड, माहिम, घोडबंदर रोड ते वान्द्रे टॉकीज.

**रूट ( O 1 ) क्रमांक** ८२ : (सचिवालय, ऑपेरा हाऊस ते वरळी सी फेस ). जमशेटजी टाटा रोड मार्गानें–चर्चगेट रेल्वे स्टेशन, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, केनेडी ब्रीज, नाना चौक, ताडदेव रोड, हॉर्नबी वेलार्ड ( दक्षिण ), क्लार्क रोड, महालक्ष्मी रेल्वे स्टेशन, हेन्स रोड, वरळी नाका, वरळी कॅलटॅक्स् पेट्रोल पंप, अब्दुल गफार खान रोड, वरळी सी फेस ( उत्तर ).

**रूट ( O 2 ) क्रमांक** ८३ : ( बेलार्ड पिअर, फ्लोरा फाऊंटन ते सांताक्रूझ डेपो ). बॅलार्ड रोड मार्गानें–( परत येतांना बॅलार्ड रोड, स्प्रॉट रोड, विटेट रोड ) फोर्ट मार्केट, हॉर्निमन सर्कल, फ्लोरा फाऊंटन, महात्मा गांधी रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, प्रिन्सेस स्ट्रीट, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रीज, ह्यूजेस रोड, केम्पस् कॉर्नर, पेडर रोड, हॉर्नबी वेलार्ड, वरळी नाका, प्रभादेवी, कॅडल रोड, शीतळादेवी मंदिर रोड, लेडी जमशेटजी रोड, माहिम, माहिम कॉजवे, घोडबंदर रोड, सांताक्रूझ डेपो.

**रूट** ( O 2 ) ( Exp. ) एक्स्प्रेस. **क्रमांक** ८४ : ( फ्लोरा फाऊंटन ते अंधेरी रेल्वे स्टेशन–पश्चिम ). महात्मा गांधी रोड मार्गानें–धोबीतलाव, पहिला मरीन रस्ता, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रीज, ह्युजेस रोड, केम्पस् कॉर्नर, पेडर रोड, हॉर्नबी वेलार्ड, वरळी नाका, प्रभादेवी, कॅडल रोड, शीतळादेवी मंदिर रोड, लेडी जमशेटजी रोड, माहिम, माहिम कॉजवे, घोडबंदर रोड, अंधेरी रेल्वे स्टेशन ( पश्चिम ).

**रूट ( O 3 ) क्रमांक** ८५ : ( फ्लोरा फाऊंटन ते सायन ). वीर नरीमन रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रीज, ह्युजेस रोड, हार्वे रोड, नाना चौक, ताडदेव रोड,

हार्नबी वेलार्ड, वरळी नाका, प्रभादेवी रोड, दादर पोर्तुगीज चर्च, गोखले रोड, शिवाजी पार्क, न. चिं. केळकर रोड, प्लाझा, टिळक पूल, दादर ट्रॅम टर्मिनस, डॉ. आंबेडकर रोड, किंग सर्कल, सायन हॉस्पिटल, सायन रोड, सायन.

**रूट ( O 4 ) क्रमांक ८६** : ( बेलार्ड पिअर, फ्लोरा फाऊंटन ते शिवाजी पार्क ). बॅलार्ड रोड मार्गानें–( परत येतांना बेलार्ड रोड, स्प्रॉट रोड, विटेट रोड ) फोर्ट मार्केट, हॉर्निमन सर्कल, फ्लोरा फाऊंटन, महात्मा गांधी रोड, धोबीतलाव, गिरगांव रोड, प्रिन्सेस स्ट्रीट, क्विन्स रोड, न्यू क्विन्स रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रीज, ह्युजेस रोड, केम्पस् कॉर्नर, पेडर रोड, हॉर्नबी वेलार्ड, वरळी नाका, प्रभादेवी, दादर पोर्तुगीज चर्च, गोखले रोड ( उत्तर ), शिवाजी पार्क.

**रूट ( P ) क्रमांक १०५** : ( म्युझियम ते मलबार हिल ). महात्मा गांधी रोड मार्गानें–फ्लोरा फाऊंटन, डॉ. दादाभाई नौरोजी रोड, बोरी बंदर, कॉफर्ड मार्केट, कारनॅक रोड, धोबी तलाव, गिरगांव रोड, चर्नीरोड, न्यू क्विन्स रोड, ( परत येतांना गिरगांव रोडनें ) ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रिज, हयुजेस रोड, हार्वे रोड, नानाचौक, गवालिया टँक रोड, केम्पस् कॉर्नर, गिब्स् रोड, हँगिंग गार्डन, रिज रोड, मलबार हिल.

**रूट ( P 1 ) क्रमांक १०७** : ( कुलाबा बस स्टेशन ते हँगिंग गार्डन ). कुलाबा रोड मार्गानें–( परत येतांना किट्रीज रोडनें ) कुलाबा कॉजवे, म्युझियम, म. गांधी रोड, फ्लोरा फाऊंटन, वीर नरीमन रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, क्विन्स रोड, चर्नीरोड, प्रार्थना समाज, सरदार वल्लभभाई पटेल रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी सी फेस, वाळकेश्वर रोड, मलबार हिल बस टर्मिनस्, रिज रोड, हँगिंग गार्डन.

**रूट ( R ) क्रमांक ४३** : ( अफगाण चर्च ते किंगसर्कल ).

कुलाबा रोड मार्गानें–वुडहाऊस रोड, किट्रीज रोड, (परत येतांना कुलाबा रोडनें), कुलाबा कॉजवे, म्युझियम, अपोलो स्ट्रीट, कस्टम हाऊस रोड, फोर्ट मार्केट, बॅलार्ड रोड, स्प्रॉट रोड, विटेट रोड, जनरल पोस्ट ऑफिस, फ्रिअर रोड, कारनॅक बंदर, वाडी बंदर, डाकयार्ड रोड, रे रोड, अल्बर्ट रोड, काळा चौकी, लालबाग, डॉ. आंबेडकर रोड, परळ, दादर, किंग सर्कल.

**रूट (R1) क्रमांक ४४** : म्युझियम ते वरळी व्हिलेज–कस्टम हाऊस रोड मार्गानें–फोर्ट मार्केट, फ्रियर रोड, कारनॅक रोड, वाडीबंदर, डॉकयार्ड रोड, रे रोड, टॅंक बंदर रोड, अल्बर्ट रोड, काळा चौकी, लालबाग, करी रोड, फर्ग्युसन रोड, वरळी डी. डी. चाळ रोड, ग्लोब मिल्स् पॅसेज, डॉ. ॲनी बझंट रोड, बेंगाल केमिकल्स्, वरळी व्हिलेज.

**रूट (R3) क्रमांक १३४** : (इलेक्ट्रिक हाऊस ते बोरीबंदर) गार्डन रोड मार्गानें–मिअर वेदर रोड, गार्डन रोड, कुलाबा कॉजवे, आर्मिस्टन रोड, कूपरेज, बॅंडस्टॅंड, क्विन्स रोड, दिनशा वाच्छा रोड, जमशेटजी टाटा रोड, चर्चगेट रेल्वे स्टेशन, वीर नरीमन रोड, फ्लोरा फाऊंटन, दादाभाई नौरोजी रोड, सर फेरोजशहा मेथा रोड, बॅलार्ड रोड, स्प्रॉट रोड, विटेट रोड, फोर्ट स्ट्रीट, बोरी बंदर.

**रूट (S) क्रमांक ४६** : (बाबुलनाथ रोड ते शिवडी रेल्वे स्टेशन) चौपाटी सी फेस मार्गानें—सॅंडहर्स्ट ब्रिज, ऑपेरा हाऊस, सरदार वल्लभभाई पटेल रोड, वाडी बंदर, डाकयार्ड रोड, रे रोड, जकेरिया बंदर रोड, जुबिली मिल्स, टोकरसी जीवराज रोड, किंग एडवर्ड रोड, शिवडी रेल्वे स्टेशन.

**रूट (T) क्रमांक ६८** : (बोरीबंदर ते वरळी डी. डी. चाळी-पर्यंत) क्रूकशॅंक रोड मार्गानें—धोबी तलाव, गिरगांव रोड, ठाकुरद्वार, ठाकुरद्वार रोड, खत्तर गली, (परत येतांना कुंभार तुकडा किंवा भुलेश्वर

नाका), सी. पी. टँक, नळबाजार, डंकन रोड, नवा नागपाडा, रिपन रोड, जेकब सर्कल, आर्थर रोड, लालबाग, करीरोड, लोअर परळ, फर्ग्युसन रोड, वरळी नाका, वरळी डी. डी. चाळ रस्ता, वरळी डी. डी. चाळ.

**रूट (T I) क्रमांक** १५१ : (सी. पी. टँक ते जेकब सर्कल) नळ बाजार रोड मार्गानें—नळ बाजार, डंकन रोड, नवा नागपाडा, रिपन रोड, जेकब सर्कल.

**रूट (V) क्रमांक ४७** : (फोर्ट मार्केट ते बाबुलनाथ रोड). फ्रियर रोड मार्गानें—कर्नाक बंदर, वाडी बंदर, वल्लभभाई पटेल रोड, ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी सी फेस, बाबुलनाथ रोड.

**क्रमांक** ६९ : (फ्लोरा फाऊंटन ते परळ ट्रॅम टर्मिनस) दादाभाई नौरोजी रोड मार्गानें—बोरी बंदर, क्रूकशँक रोड, धोबी तलाव, गिरगांव रोड, चर्नी रोड, प्रार्थना समाज, बाळाराम स्ट्रीट, फोरास रोड, बेलासिस रोड, क्लेअर रोड, डॉ. आंबेडकर रोड, जिजिभाय लेन, परळ गव्हर्नमेंट गेट रोड, किंग एडवर्ड रोड, परळ ट्रॅम टर्मिनस.

## सुरू करण्यांत आलेले नव्या क्रमांकाचे नवे मार्ग

**क्रमांक** १३० : (म्युझियम ते ताडदेव टी. टी.) मिंट रोड मार्गानें—फोर्ट मार्केट, बोरीबंदर, दादाभाई नौरोजी रोड, क्रॉफर्ड मार्केट, अब्दुल रहेमान स्ट्रीट, (परत येतांना नागदेवी स्ट्रीट) पायधुणी, बापू खोटे स्ट्रीट, नळ बाजार, फॉकलंड रोड, ताडदेव टी. टी.

**क्रमांक** १८१ : (सी. पी. टँक ते हँगिंग गार्डन) वल्लभभाई पटेल रोड मार्गानें-ऑपेरा हाऊस, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी सी फेस, वाळकेश्वर रोड, मलबारहिल बस टर्मिनस, रिज रोड, हँगिंग गार्डन.

**क्रमांक** १८२ : (माहिम ते जुहूबीच) माहिम कॉजवे मार्गानें—घोडबंदर रोड, विठ्ठलभाई पटेल रोड, जुहू रोड, जुहू बीच.

**क्रमांक** १८३ : (विहार तलाव स्पेशल—सायन ते विहार तलाव)

मुंबई–आग्रा रोड मार्गानें–कुर्ला पोस्ट कचेरी, कुर्ला–मरोळ रोड, साकी नाका, विहार रोड, विहार सरोवर.

**क्रमांक** १८४ : ( अंधेरी रेल्वे स्टेशन ( पूर्व ) ते विहार लेक ) सहार रोड मार्गानें–मथुरादास वसनजी रोड, अंधेरी–कुर्ला रोड, साकी नाका, विहार रोड, विहार सरोवर.

**क्रमांक** १८५ : ( घाटकोपर ते विहार लेक ) मुंबई–आग्रा रोड मार्गानें–कुर्ला–अंधेरी रोड, साकी नाका, विहार रोड,–विहार सरोवर.

**क्रमांक** १८५ : ( जेकब सर्कल ते वरळी सी फेस–उत्तर ). आर्थर रोड मार्गानें–लालबाग, करी रोड, लोअर परळ, फर्ग्युसन रोड, वरळी नाका, वरळी कॅलटॅक्स पेट्रोल पंप, अब्दुल गफारखान रोड, वरळी सी फेस ( उत्तर ).

**क्रमांक** १८७ : ( बोरीवली ते नॅशनल पार्क ) कान्हेरी गुंफा रोड, नॅशनल पार्क.

**क्रमांक** १८८ : ( बोरीवली ते कान्हेरी केव्हज् ) कान्हेरी गुंफा रोड, कान्हेरी कोरीव लेणीं.

## उपनगरांतील बस वहातूक

**रूट ( A ) सब क्रमांक २०१ :** परळ ट्रॅम टर्मिनस ते अंधेरी रेल्वे स्टेशन. दादर रोड मार्गानें–दादर ट्रॅम टर्मिनस, शिवाजी पार्क, शीतळादेवी टेंपल रोड, माहिम कॉजवे, प्रिन्सेस ॲवेन्यू, घोडबंदर रोड, सांताक्रूझ, इर्ला ब्रिज, अंधेरी रेल्वे स्टेशन.

**रूट ( A 1 ) सब क्रमांक २०३ :** माहिम ते ओशिवरा ब्रिज. माहिम कॉजवे मार्गानें—घोड बंदर रोड ते ओशिवरा ब्रिज.

**रूट ( B ) सब क्रमांक २०२ :** अंधेरी रेल्वे स्टेशन ते बोरीवली डेपो. घोडबंदर रोड मार्गानें.

**रूट ( B 1 ) सब क्रमांक २९१ :** बोरीवली रेल्वे स्टेशन ते दहिसर चेक नाका.

**रूट ( C ) सब क्रमांक २११ :** बॅंड स्टॅंड ते डॉ. आंबेडकर रोड. बैरामजी जिजिभाय रोड मार्गाने-हिल रोड, बान्द्रा रेल्वे स्टेशन रोड, बान्द्रा स्टेशन, टर्नर रोड, पाली रोड, पाली हिल व डॉ. आंबेडकर रोड.

**रूट ( C 1 ) सब क्रमांक २१२ :** गव्हर्नमेंट सर्व्हंटस् कॉलनी ते वान्द्रें रेल्वे स्टेशन ( पश्चिम ). वेस्टर्न एक्सप्रेस हायवे मार्गाने-माहिम कॉजवे ते वान्द्रा रेल्वे स्टेशन.

**रूट ( D ) सब क्रमांक २१३ :** हिल रोड ते पेरी रोड. वान्द्रा स्टेशन रोड मार्गाने-वान्द्रें स्टेशन, टर्नर रोड, पेरी रोड, पेरी रोड टर्मिनस.

**क्रमांक २१४ :** वान्द्रें रेल्वे स्टेशन ते पाली हिल. घोडबंदर रोड मार्गाने-विठ्ठलभाई पटेल रोड मार्गाने नॅशनल कॉलेज, ३२ वा रस्ता, २४ वा रस्ता, ३० वा रस्ता, पाली हिल.

**रूट E सब क्रमांक २७१ :** मालाड रेल्वे स्टेशन ते मढ. आनंद रोड मार्गाने-कस्तुरबा रोड, ( परत येतांना मालाड स्टेशन रोड मार्गाने ) घोडबंदर रोड, मालाड-मार्वे-मढ रोड ते मढ.

**रूट E 1 सब क्रमांक २७२ :** मालाड रेल्वे स्टेशन ते मार्वे. आनंद रोड मार्गाने-कस्तुरबा रोड, ( परत येतांना मालाड स्टेशन रोड मार्गाने ) घोडबंदर रोड, मालाड-मार्वे रोड ते मार्वे.

**रूट F सब क्रमांक २३१ :** सांताक्रूझ ते जुहू चर्च. रेल्वे स्टेशन मार्गाने-स्टेशन रोड, घोडबंदर रोड, जुहू रोड, जुहू चर्च.

**रूट G सब क्रमांक २९२ :** बोरीवली रेल्वे स्टेशन ते वल्लभनगर. घोडबंदर रोड मार्गाने-सरदार वल्लभभाई पटेल रोड, एल्. आय. सी. रोड, माऊंट पोइसर चर्च ते वल्लभनगर.

**रूट H सब क्रमांक २२१ :** खार रेल्वे स्टेशन ते दांडा. स्टेशन रोड मार्गाने-दांडा रोड, दांडा.

**रूट K सब क्रमांक २५१ :** अंधेरी रेल्वे स्टेशन ते वर्सोवा. घोडबंदर

रोड मार्गानें–वरसोवा रोड, हंसराज रोड, भवन्स कॉलेज, दादाभाई रोड, ( परत येतांना वर्सोवा रोड ) वरसोवा रोड ते वर्सोवा.

**रूट K 1 सब क्रमांक २५२ :** अंधेरी रेल्वे स्टेशन (पश्चिम) ते अंबोली व्हिलेज. घोडबंदर रोड मार्गानें–सिझर रोड, अंबोली व्हिलेज.

## पूर्वेकडील उपनगरांतील बस वहातुक

**रूट ( L ) सब क्रमांक ३६१ :** माहूल व्हिलेज ते कुर्ला रेल्वे स्टेशन ( पूर्व ). माहूल–घाटकोपर रोड मार्गानें–सायन ट्रॉम्बे रोड, सिंधी सोसायटी, सी. एस. टी. रोड, कुर्ला रेल्वे स्टेशन.

**रूट ( M ) सब क्रमांक ३५१ :** सायन ते स्टँडर्ड व्हॅक्युम रिफायनरीज–चेंबूर सायन रोड मार्गानें–वॉटरफ्रंट रोड, चेंबूर कँप, मरोली चर्च, वाशी नाका, कॉरिडर चर्च, स्टँडर्ड व्हॅक्युम रिफायनरी ते ॲटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट.

**रूट ( M ) सब क्रमांक ३५१ :** सायन ते ॲटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट तुर्भे पर्यंत, फक्त ही वहातुक कारखाना उघडा असेल तोंपर्यंतच असते.

**रूट ( N ) सब क्रमांक ३५२ :** सायन ते तुर्भे. चेंबूर–सायन रोड मार्गानें तुर्भे–चेंबूर रोड ते तुर्भे.

**रूट ( N ) सब क्रमांक ३७१ :** सायन ते चेंबूर रेल्वे स्टेशन. चेंबूर रोड मार्गानें–चुनाभट्टी, चेंबूर नाका, सेंट्रल ॲवेन्यू, चेंबूर रेल्वे स्टेशन.

**रूट ( O ) सब क्रमांक ३०१ :** सायन ते मुलुंड. मुंबई–आग्रा रोड मार्गानें–कुर्ला कोर्ट, कुर्ला डाक घर, बाळकराम रोड, जुना आग्रा रोड, मुंबई–आग्रा रोड, जयंतीलाल विष्णु रोड, जेठालाल पारीख रोड, हिराचंद देसाई रोड, मुंबई–आग्रा रोड ते मुलुंड.

**रूट ( O 1) सब क्रमांक ३९१ :** मुलुंड रेल्वे स्टेशन ते मुलुंड कॉलनी. भांडुप–मुलुंड कॉलनी मार्गानें- मुलुंड पेट्रोल पंप, भालेश्वर मंदिर ते मुलुंड कॉलनी.

अनुक्रमांक ...२८८३७... दि: ...
क्रमांक ...३८८२... ग्रं: वि: ...



**रूट ( O 2 ) सब क्रमांक ३०२ :** सायन ते मुलुंड बस स्टेशन. मुंबई–आग्रा रोड मार्गानें–कुर्ला कोर्ट, कुर्ला डाक घर, जयंतीलाल वैष्णव रोड, जेठालाल पारेख रोड, हिराचंद देसाई रोड, मुंबई–आग्रा रोड, डॉ. राजेंद्रप्रसाद रोड, म. गांधी रोड, सरदार वल्लभभाई पटेल रोड, मुलुंड रेल्वे स्टेशन, नेताजी सुभाषचंद्र बोस रोड, डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, मुंबई–आग्रा रोड, मुलुंड बस स्टेशन.

**रूट ( P ) सब क्रमांक ३८१ :** बर्माशेल रिफायनरीज ते घाटकोपर रेल्वे स्टेशन. वडाळा रोड मार्गानें–स्टॅनव्हॅक नगर, वाशी नाका, मरोली चर्च, सुखी निवास, शांति बाग, अमर महाल, सिंधु वाडी, घाटकोपर रेल्वे स्टेशन ( पूर्व ).

**रूट ( R ) सब क्रमांक ३११ :** कुर्ला गोल बिल्डिंग ते सांताक्रूझ रेल्वे स्टेशन ( पूर्व ). कुर्ला रेल्वे स्टेशन रोड मार्गानें—जुना आग्रारोड, मुंबई–आग्रारोड, कोली कालिना रोड, जुना मिलीटरी रोड, जवाहरलाल नेहरू रोड, सांताक्रूझ रेल्वे स्टेशन रोड ते सांताक्रूझ ( पूर्व ).

**रूट ( S ) सब क्रमांक ३१२ :** विलेपारलें रेल्वे स्टेशन ( पूर्व ) ते सांताक्रूझ रेल्वे स्टेशन ( पूर्व ). दयाळदास रोड मार्गानें—टर्मिनल बिल्डिंग, सिग्नल केबिन, एअरपोर्ट हॅंगर्स, पाईप लाईन, गव्हर्नमेंट हाऊसिंग कॉलनी ते सांताक्रूझ रेल्वे स्टेशन ( पूर्व ).

**रूट ( T ) सब क्रमांक ३२१ :** सहार व्हिलेज ते विलेपारलें ( पूर्व ). सहार व्हिलेज रोड मार्गानें—चकला रोड, टॅक्सी ट्रॅक रोड, नेहरू रोड, तेजपाळ रोड, विलेपारलें ( पूर्व ).

**रूट ( T 1 ) सब क्रमांक ३३१ :** सहार व्हिलेज ते अंधेरी रेल्वे स्टेशन. सहार रोड मार्गानें–कोल डोंगरी, सालसेत टॅंकरोड, अंधेरी रेल्वे स्टेशन ( पूर्व ).

**रूट ( T 2 ) सब क्रमांक ३२२ :** चकला सिगारेट फॅक्टरी ते विलेपारलें रेल्वे स्टेशन. न्यू लिंक रोड मार्गानें–न्यू टर्मिनल बिल्डिंग, नेहरू रोड, तेजपाळ रोड, विलेपारलें रेल्वे स्टेशन ( पूर्व )

